मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले






। उपसंपादक - श्री विलास गायकवाड । कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे । निवासी संपादक - श्री राकेश पाटील । सह संपादक - श्री मुकुंद कांबळे । महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

■ वर्ष : ३ ■ अंक : ९७ ■ सोमवार, १५ डिसेंबर २०२५ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514


# विदर्भाला विकासाचे वैभव प्राप्त करून देण्यासाठी कटिबद्ध - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## मुंबईकरांसाठी घेतलेल्या निर्णयांचे योजनापुष्प बाळासाहेबांच्या चरणी अर्पण

## अंतिम आठवडा उत्तरात घेतला विकास कामांचा आढावा

**दैनिक युवक आधार**
**नागपूर, प्रतिनिधी :**

'सर्वांसाठी घरे' या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेला मूर्त रूप देण्यासाठी आणि सर्वसामान्य मुंबईकरांचे घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी शासनाने अनेक क्रांतिकारी निर्णय घेतले आहेत. मुंबईतील पुनर्विकासातील अडथळे दूर करून मुंबईकरांना मोठा दिलासा दिला आहे. येत्या २३ जानेवारी पासून हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त मुंबईकरांसाठी या योजना आणून बाळासाहेबांच्या चरणी योजनापुष्प अर्पण करीत असल्याची भावना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधान परिषदेत व्यक्त केली. मुंबईच्या गतिमान विकासातून महाराष्ट्राचा सुपरफास्ट विकास होत असल्याचे सांगतानाच विदर्भाला विकासाचे वैभव प्राप्त करून देण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याची ग्वाही उपमुख्यमंत्र्यांनी दिली.

विधान परिषदेत अंतिम आठवडा चर्चेला उत्तर देताना उपमुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. ते म्हणाले, मुंबईतील ओसी नसलेल्या सुमारे २० हजार इमारतींना सरकारने दिलासा दिला आहे. या निर्णयाचा फायदा अडीच लाखांपेक्षा जास्त कुटुंबांना आणि १० लाखांहून अधिक नागरिकांना होणार आहे. नवी मुंबईत घर घेणाऱ्यांसाठी आनंदाची बातमी असून सिडकोच्या घरांच्या किंमतीत थेट १० टक्के कपात करण्याचा निर्णय घेतला आहे.मुंबईकरांच्या गृहस्वप्नपूर्तीसाठी मुंबईला झोपडपट्टीमुक्त करण्यासाठी ५० एकरपेक्षा मोठ्या भूखंडांवर 'एसआरए क्लस्टर पुनर्विकास' राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



एसआरए योजनांच्या मंजुरीचा कालावधी १२० दिवसांवरून ६० दिवसांवर आणला आहे. रमाबाई आंबेडकर नगरमधील पुनर्वसन प्रकल्पाचे कामही सुरू झाले आहे.

मुंबईच्या गतिमान विकासासाठी मुंबईसह परिसरासाठी घेतलेल्या महत्वाच्या निर्णयांची आणि योजनांची माहिती देतांना उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले की, संजय गांधी नॅशनल पार्कमधील रहिवाशांना ५ कि.मी. परिसरात पर्यायी घरे देणार.

बंद गिरण्यांमधील १ लाख कामगारांच्या वारसांना घरे देण्याची योजना. फनेल झोन आणि डिफेन्स झोनमुळे रखडलेल्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी नवीन धोरण. महालक्ष्मी रेसकोर्स आणि कोस्टल रोडच्या जागेवर ३०० एकरचे भव्य 'सेंट्रल पार्क' उभारणे, प्रत्येक नगरपालिकेमध्ये 'नमो गार्डन' उभारणे, वर्सोवा-भाईंदर या २६ किमीच्या कोस्टल रोडलाही मुंबई उच्च न्यायालयाने मान्यता दिली आहे. बीकेसीसह संपूर्ण एमएमआरमध्ये पॉड टॅक्सी सुरू करतोय. बीकेसीमार्गे रिक्लमेशन ते नवीन एअरपोर्ट भूमिगत बोगदा करतोय.

मुंबई आणि नवी मुंबई एअरपोर्ट मेट्रोने जोडतोय या प्रकल्पांमुळे मुंबईतील वाहतूक कोंडी आणखी कमी होऊन मुंबई अधिक गतिमान होईल, अशी ग्वाहीही उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

# जंगलात बकऱ्या सोडण्याची सूचना हास्यास्पद - अजित पवार

**दैनिक युवक आधार**
**मुंबई, प्रतिनिधी :**




बिबट्यांना मानवी वस्त्यांपासून दूर ठेवण्यासाठी जंगलात बकऱ्या सोडण्याच्या राज्य वनमंत्र्यांच्या सूचनेची महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शनिवारी खिल्ली उडवली. बिबट्यांव्यतिरिक्त, गावातील लोकही या बकऱ्यांवर ताव मारतील, असे ते म्हणाले.

महाराष्ट्राचे वनमंत्री गणेश नाईक यांनी बिबट्यांना शिकारीच्या शोधात मानवी वस्त्यांमध्ये येण्यापासून रोखण्यासाठी वन अधिकाऱ्यांनी जंगलात मोठ्या संख्येने बकऱ्या सोडाव्यात, अशी सूचना केली होती.

बिबट्याच्या हल्ल्यात चार लोक मारले गेले तर राज्याला १ कोटी रुपये (भरपाई म्हणून) द्यावे लागतात. म्हणून मी अधिकाऱ्यांना सांगितले की, मृत्यू झाल्यानंतर भरपाई देण्याऐवजी १ कोटी रुपयांच्या बकऱ्या जंगलात सोडा, जेणेकरून बिबटे मानवी वस्तीत येणार नाहीत, असे मंत्री म्हणाले होते.

बिबट्यांच्या वाढत्या घटनांना तोंड देण्यासाठी सरकारच्या योजनांबद्दल विचारले असता, पवार म्हणाले की, बिबट्यांची पैदास होत आहे आणि ते महाराष्ट्राच्या काही विशिष्ट भागांमध्ये राहत आहेत.

**बकऱ्यांवर गावकरीच ताव मारतील!**

बिबट्यांऐवजी भक्ष्य म्हणून सोडलेल्या बकऱ्यांवर गावातील लोकच ताव मारतील, असे ते हसत म्हणाले. पत्रकारांशी अनौपचारिक संवादादरम्यान पवार म्हणाले की, ही कल्पना वनविभागातूनच आली असावी. नसबंदी हा एक प्रभावी पर्याय असू शकतो, परंतु त्याचा परिणाम केवळ दीर्घकाळानंतरच दिसून येईल. कारण नसबंदीनंतरही बिबटे अन्नासाठी शिकार करतच राहतील, असे पवार म्हणाले.










## सिल्लोडमध्ये 'अवैध' राज!: प्रशासनाच्या सुस्तीवर प्रश्नचिन्ह; धंद्यांना 'कोणाचे' अभय?

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यात अवैध धंद्यांचे जाळे दिवसेंदिवस फोफावत असून, या अनधिकृत कारभाराला नेमके कोणाचे 'अभय' मिळत आहे, असा ज्वलंत प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना भेडसावत आहे. महसूल आणि पोलीस प्रशासनाची 'सुस्त' भूमिका या गंभीर प्रश्नाला अधिकच धार देत आहे.




गुटखा विक्री, अवैध दारूचा साठा, वाळूचा उपसा, तसेच जुगार आणि मटक्याचे अड्डे यासारख्या समाजविघातक कृत्यांनी शहरासह ग्रामीण भागातील शांतता धोक्यात आणली आहे. विशेषतः या अनधिकृत कामांमुळे तरुणाईमध्ये व्यसनाधीनता वाढत असल्याचे चित्र आहे.

प्रशासनाकडून होत असलेल्या तुटपुंज्या आणि दिखाव्याच्या कारवाईमुळे अवैध धंदेवाले निर्ढावलेले असून, त्यांचे मनोधैर्य उंचावले आहे. हे धंदे पूर्णपणे बंद न होता, केवळ ठिकाण बदलून पुन्हा सुरू होतात. प्रशासनाच्या डोळ्यांदेखत हा गोरखधंदा सुरू असताना, महसूल यंत्रणा व पोलीस दलाचे याकडे 'दुर्लक्ष' का होत आहे, यामागील 'अर्थपूर्ण' कारण काय आहे, अशी कुजबुज आता नागरिकांमध्ये सुरू झाली आहे.

या वाढत्या अवैध धंद्यांना सत्ताधारी पक्षाचे नेते खतपाणी घालत आहेत, की प्रशासकीय अधिकारी केवळ 'आर्थिक हितसंबंधा'मुळे कारवाई करण्यास टाळाटाळ करत आहेत, याबद्दल तर्कवितर्क लावले जात आहेत. सिल्लोड तालुक्याच्या विकासासाठी हे अवैध धंदे थांबवणे आवश्यक आहे आणि त्यासाठी वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांनी तत्काळ याची दखल घेऊन प्रभावी आणि कठोर भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा सुज्ञ नागरिक व्यक्त करत आहेत.प्रशासनाने तात्काळ 'ऑपरेशन क्लीन' हाती घेऊन तालुक्याची प्रतिमा सुधारावी, ही काळाची गरज आहे. अन्यथा, या गंभीर परिस्थितीचे पडसाद येणाऱ्या काळात निश्चितच उमटतील, अशी भीती व्यक्त होत आहे.

# मित्रत्व, सामाजिक बांधिलकी आणि लोकशाहीसाठीचा ठाम पाठिंबा

### मार्लेगाव पंचायत समिती निवडणुकीसाठी शुभम कळलावे यांच्या पाठीशी मित्रांचा आर्थिक व नैतिक आधार

**दैनिक युवक आधार**

**उमरखेड /राजू गायकवाड :** वनव्यामध्ये गारव्याची चाहूल लागावी, तसा दिलासा देणारा आणि आश्वासक असा मित्रांचा आधार पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दिसून आला आहे. समाजकारणात सातत्याने सक्रिय असलेले, तरुणाईचे प्रतिनिधित्व करणारे नेतृत्व म्हणून ओळख असलेले शुभम कळलावे यांनी मार्लेगाव पंचायत समिती निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतल्यानंतर त्यांच्या मित्रांनी एकत्र येत आर्थिक व नैतिक पाठिंबा देत आपली सामाजिक बांधिलकी अधोरेखित केली आहे.

मित्र वैजनाथ चिंचोलकर, ॲड. धनेश चिंचोलकर, डॉ. आकाश आसेगावकर आणि शिवराज साखरे यांनी एकत्रितपणे प्रत्येकी ११ हजार रुपये याप्रमाणे एकूण ४४ हजार रुपयांची



आर्थिक मदत शुभम कळलावे यांना निवडणूक खर्चासाठी सुपूर्द केली. ही मदत केवळ आर्थिक स्वरूपाची नसून, परिवर्तनाच्या लढ्यातील विश्वास, मैत्री आणि लोकशाही मूल्यांवरील श्रद्धेचे प्रतीक असल्याचे यावेळी उपस्थितांनी स्पष्ट केले.या प्रसंगी मित्रांनी शुभम कळलावे यांच्या सामाजिक कार्याबाबत आपली ठाम भूमिका मांडली.

“शुभम कळलावे हे केवळ एक निवडणूक लढवणारे उमेदवार नसून, ते समाजातील तरुणांच्या आशा-आकांक्षांचे प्रतिनिधित्व करणारे नेतृत्व आहे. शिक्षण, युवक सक्षमीकरण, स्थानिक विकास, सामाजिक न्याय आणि पारदर्शक प्रशासन या विषयांवर त्यांनी सातत्याने काम केले आहे. त्यांच्या विचारांमध्ये स्वार्थ नसून सेवाभाव आहे. त्यामुळे सामाजिक तसेच लोकशाही प्रक्रियेत त्यांना पाठिंबा देणे हे आमचे कर्तव्य आहे,” असे मत मित्रांनी व्यक्त केले.या वेळी बोलताना शुभम कळलावे यांनी मित्रांच्या या पाठिंब्याबद्दल मनापासून कृतज्ञता व्यक्त केली.

“मित्रांनी दाखवलेला विश्वास ही माझ्यासाठी मोठी प्रेरणा आणि ताकद आहे. ही निवडणूक केवळ माझी वैयक्तिक लढाई नसून, सर्वसामान्य नागरिकांच्या हक्कांसाठीची आणि विकासासाठीची चळवळ आहे. पंचायत समितीच्या माध्यमातून शेतकरी, महिला, युवक, विद्यार्थी आणि गरजू घटकांसाठी प्रभावी व प्रामाणिक काम करण्याचा माझा ठाम निर्धार आहे,” असे त्यांनी सांगितले.

याच अनुषंगाने शुभम कळलावे यांनी सर्वसामान्य जनतेकडेही आर्थिक मदतीचे आवाहन केले आहे.“निवडणूक ही लोकांची, लोकांसाठी आणि लोकांनी चालवलेली असावी. या उद्देशाने नागरिकांनी शक्य तेवढे छोटे-छोटे योगदान द्यावे. अनेक छोट्या मदतीतून मोठा आणि सकारात्मक बदल घडू शकतो,” असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मित्रांचा ठाम विश्वास, समाजाचा वाढता पाठिंबा आणि परिवर्तनाची स्पष्ट दृष्टी या बळावर शुभम कळलावे मार्लेगाव पंचायत समिती निवडणुकीत सक्षमपणे उतरले असून, ही निवडणूक लोकशाहीतील सहभागाची नवी दिशा दाखवणारी ठरेल, अशी चर्चा सध्या संपूर्ण परिसरात रंगू लागली आहे.

## महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसुत्र खेचुन पसार होणाऱ्या त्रिकुटापैकी दोघांना पनवेल शहर पोलिसांनी घेतले ताब्यात

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसुत्र खेचुन पसार होणाऱ्या त्रिकुटापैकी दोघांना अजमेर राजस्थान येथुन पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे . फिर्यादी ज्योती जानकर, (वय ६०) या पनवेल हददीतील वडाळे तलाव स्मशानभूमी येथून घरी जात असताना आरोपीत यांनी रिक्षा मधुन येवून त्यांच्या गळ्यातील दोन सोन्याचे मंगळसुत्र खेचुन



चोरी करून पळुन गेले होते. या बाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात होताच .वपोनि नितीन ठाकरे यांचे मार्गदर्शनाखाली, पोलीस उप निरीक्षक हजरत पठाण, पोहवा मिथुन भोसले, पोना प्रविण मेथे, पोशि साईनाथ मोकळ, पोशि किरण कराड आदींच्या तपास पथकाने तांत्रिक तपास व सी.सी.टी.व्ही. फुटेजच्या आधारे आरोपी मोहम्मद इर्शाद मोहम्मद नौशाद सिध्दीकी वय-२२ वर्षे, धंदा-रिक्षा चालक रा.गोवंडी व त्याचा सहकारी अफरोज फिरोज शेख वय-१८ रा. गोवंडी तसेच आवेश (पुर्ण नाव पत्ता माहित नाही) यांनी रिक्षा मधुन येवून त्यांचे सोन्याचे मंगळसुत्र खेचुन पसार झाले होते . अधिक तपासात यातील दोघेजण हे अजमेर राजस्थान येथे लपून बसल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना सदर ठिकाणी जाऊन अटक केली आहे. तर पाहिजे आरोपी आवेश याचा शोध सुरु असून, अधिक तपास पोलीस उप निरीक्षक हजरत पठाण करीत आहेत.

## ज्येष्ठ नागरिक साप्ताहिक सभेत आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिवस संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर ) :** पनवेल शहरातील ज्येष्ठ नागरिक हॉल या ठिकाणी ज्येष्ठ नागरिक साप्ताहिक सभेत आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिवस संपन्न झाला . पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे यांचे मार्गदर्शनाखाली मानवी हक्क दिवस कार्यक्रम संपन्न झाला . यावेळी मानवी हक्क म्हणजे काय, मानवी हक्क दिवस का साजरा केला जातो ,भारतातील मानवी हक्कांचे संरक्षण,मानवी हक्कांचे महत्व व विद्यार्थ्यांनी काय शिकावे , तसेच सायबर सुरक्षितता , ज्येष्ठ नागरिकांसंबंधी कायदे व अधिकार याबाबत थोडक्यात माहिती देण्यात आली .सदर कार्यक्रमास 150 ते 200 ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.



## बनोटी—नायगाव शिव पानंद रस्त्याचे भूमिपूजन उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/ विजय काळे :** तालुक्यातील बनोटी–नायगाव शिवारातील शिव पानंद रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन आज दिनांक १४/१२/२०२५ रोजी माननीय आमदार सौ.संजनाताई जाधव (कन्नड–सोयगाव) यांच्या माध्यमातून मंजूर झालेल्या निधीतून उत्साहात पार पडले.या कार्यक्रमास वाडी ग्रामपंचायतीचे लोकनियुक्त सरपंच नितीन अण्णा बोरसे,बनोटी ग्रामपंचायतीचे सरपंच मुरलीबापू पाटील,

उपसरपंच ऋषिकेश पाटील,सदस्य भूषण पाटील,माजी उपसरपंच भगवान दादा पाटील,माजी सदस्य स्वप्निल



पाटील,जेष्ठ नागरिक शिवाजी दादा सोनवणे,रोहित पाटील,कुणाल पाटील,कृष्णा वेहले यांच्यासह बनोटी–नायगाव शिवारातील सर्व ग्रामस्थ मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.या शिव पानंद रस्त्याच्या कामामुळे शेतकरी, ग्रामस्थ व वाहनधारकांना ये–जा सुलभ होणार असून शेतीमाल वाहतूक तसेच दैनंदिन प्रवासात मोठी सोय होणार आहे. रस्ता विकासामुळे परिसराच्या सर्वांगीण प्रगतीला चालना मिळेल,असा विश्वास यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

**सरपंच नितीन अण्णा बोरसे यांची प्रतिक्रिया :**

“बनोटी–नायगाव शिव पानंद रस्त्याचे काम मंजूर होऊन आज भूमिपूजन झाले, ही ग्रामस्थांसाठी आनंदाची बाब आहे. या रस्त्यामुळे शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांची वाहतूक सुलभ होणार असून विकासाला गती मिळणार आहे. या महत्त्वपूर्ण कामासाठी माननीय आमदार सौ. संजनाताई जाधव यांचे मी ग्रामस्थांच्या वतीने मनापासून आभार मानतो.”

## ईट प्ले रीड अभियाना मार्फत जिल्हा परिषद शाळेमध्ये जनजागृती

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** उत्साहवर्धक उपक्रमात, ईट प्ले रीड या ना-नफा संस्थेने निरोगी खाणे, आनंदी खेळ आणि उत्सुक वाचनाला नवीन उंचीवर नेण्याचे ध्येय हाती घेतले आहे. अलीकडेच, संस्थेने दैनंदिन जीवनात या महत्त्वाच्या घटकांचे महत्त्व पटवून देण्यासाठी जी. प. प्रा. शाळा दळवटणे येथे भेट दिली.

ईट प्ले रीड टीमच्या सदस्यांनी तेथील विद्यार्थी व शिक्षक यांना एक सादरीकरण दिले. सादरीकरणाने केवळ सकस आहाराचे फायदे अधोरेखित केले नाहीत तर खेळाचा आनंद आणि उत्सुक




वाचनाच्या परिवर्तनीय शक्तीवरही भर दिला. विद्यार्थ्यांमध्ये लक्षवेधी प्लेकार्ड आणि विचारपूर्वक तयार केलेल्या डायरीचे वाटप केले. ईट प्ले रीडने अशा शाळेवर लक्ष्य केंद्रित केले आहे, एक असे क्षेत्र जेथे अशा उपक्रमांची अनेकदा कमतरता असते. संसाधनांपर्यंत मर्यादित प्रवेश असलेल्या समुदायापर्यंत त्यांचा संदेश पोहोचवून, संस्थेने सर्वसमावेशकता आणि प्रवेशयोग्यतेसाठी अस्सल वचनबद्धता दाखवली. संस्थेने आपले ध्येय सुरू ठेवल्यामुळे, आशा आहे की हा तळागाळातील प्रयत्न व्यापक समुदाय सहभागासाठी उत्प्रेरक म्हणून काम करेल. इट प्ले रीड म्हणजे केवळ माहितीचे वितरण नाही; तर ते तरुणांच्या मनात बदलाची बीजे पेरत आहे, असे भविष्य घडवत आहे जिथे सकस आहार, आनंदी खेळ आणि जिज्ञासू वाचन हे प्रत्येक मुलाच्या प्रवासाचे अविभाज्य भाग आहेत.

## लोकनियुक्त सरपंच माननीय अमोल पाटील यांना आदर्श सरपंच पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर :** पाचुंब्री तालुका शिराळा येथील लोकनियुक्त युवा सरपंच माननीय अमोल पाटील यांना कराड तालुका कुस्ती संघ कला क्रीडा सांस्कृतिक ट्रस्ट यांच्या संकल्पनेतून १५ नोव्हेंबर २०२५ रोजी कुशल कुस्ती संघटक पै. तानाजी चवरे (आप्पा) वाढदिवस उत्सव समिती यांच्यावतीने आदर्श सरपंच पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.अमोल पाटील यांना राजकीय ,सामाजिक व शैक्षणिक क्षेत्राची आवड असल्यामुळे पहिल्या पाच वर्ष गावचे उपसरपंच पदभार सांभाळताना अहोरात्र गावच्या विकासासाठी काम केले. गावच्या नागरिकांनी पुढील पाच वर्षासाठी पाचुंब्री गावचे लोकनियुक्त सरपंच पदासाठी निवडून दिले. गावातील नागरिकांनी दिलेल्या संधीचे सोने करून पाचुंब्री गावचा सर्वांगीण विकास करून शिराळा



तालुक्यात नावलौकिक वाढवण्याचे काम केले. सर्वांगीण गावच्या विकासाच्या कामामुळे कराड तालुका कुस्ती संघ कला क्रिडा सांस्कृतिक ट्रस्ट महाराष्ट्र राज्य यांच्या संकल्पनेतून अमोल पाटील यांना आदर्श सरपंच म्हणून सन्मानित करण्यात आले .

पाचुंब्री गावातील व शिराळा तालुक्यातील मार्गदर्शक,हितचिंतक, मित्रपरिवार यांनी अमोल पाटील यांचे कौतुक करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

## पतंगोत्सवाच्या पार्श्वभूमीवर लासलगाव पोलिसांचा कडक इशारा; नागरिकांना कायद्याचे पालन करण्याचे आवाहन

### नायलॉन मांजामुळे जीवितास धोका; वापर, विक्री व साठवणूक करणाऱ्यांवर गुन्हे दाखल होणार

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे/निफाड:** नायलॉन मांजाचा वापर, विक्री व साठवणूक करणे हा कायद्याने गुन्हा असून, त्यातून गंभीर अपघात घडत असल्याचे वारंवार निदर्शनास येत आहे. नायलॉन मांजामुळे दुचाकीस्वार, पादचारी, लहान मुले तसेच पक्षी व प्राणी गंभीर जखमी होत असून काही घटनांमध्ये जीवितहानीही झाल्याचे प्रकार समोर आले आहेत. या पार्श्वभूमीवर नायलॉन मांजा वापरणारे, विक्री करणारे अथवा साठवणूक करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा लासलगाव पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांनी दिला आहे.

पतंगोत्सवाच्या काळात नायलॉन मांजाचा सर्रास वापर होत असल्याचे आढळून येत असून हा मांजा अत्यंत धारदार व प्राणघातक असल्याने रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांसाठी मोठा धोका निर्माण होत आहे. विशेषतः दुचाकीस्वारांच्या मानेला व चेहऱ्याला गंभीर जखमा होण्याचे प्रकार वारंवार घडत असल्याचे त्यांनी सांगितले.

शासनाने नायलॉन मांजाच्या विक्रीवर स्पष्ट बंदी घातलेली असतानाही काही ठिकाणी छुप्या पद्धतीने त्याची विक्री सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे. अशा विक्रेत्यांवर गुन्हे




सहायक पोलीस निरीक्षक
लासलगाव पोलीस स्टेशन नाशिक

दाखल करून कायदेशीर कारवाई करण्यात येणार असून, नायलॉन मांजाचा वापर करताना कोणीही आढळून आल्यास कोणतीही तडजोड न करता कठोर कारवाई करण्यात येईल, असेही शिंदे यांनी स्पष्ट केले.

नागरिकांनी कायद्याचे पालन करावे, नायलॉन मांजाचा वापर टाळावा तसेच कुठेही अशा मांजाची विक्री होत असल्याचे आढळल्यास तात्काळ लासलगाव पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिस प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# सोयगाव तालुक्यात बीएसएनएल बंद; नागरिकांचा संताप

## कार्यालयाला कुलूप ठोकण्याचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/विजय काळे** : शहरातील व तालुक्यात मागील तीन दिवसांपासून बीएसएनएलची दूरध्वनी व इंटरनेट सेवा पूर्णपणे बंद असून याचा मोठा फटका तहसील कार्यालयासह राष्ट्रीयकृत व सहकारी बँकांच्या कामकाजावर बसला आहे.बीएसएनएल सेवा ठप्प झाल्यामुळे बँकांचे व्यवहार पूर्णपणे ठप्प झाले असून नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेष म्हणजे, सोयगाव येथे बीएसएनएलचे कोणतेही संबंधित जबाबदार अधिकारी नियमितपणे उपस्थित राहत नसल्याने तक्रारींची तात्काळ दखल घेतली जात नाही.




तालुक्यातील बीएसएनएल कार्यालयाचे कामकाज छत्रपती संभाजीनगर येथूनच चालविले जात असल्यामुळे स्थानिक पातळीवर सेवा बिघाड झाल्यास नागरिकांना कोणाकडे दाद मागावी,असा प्रश्न निर्माण झाला आहे.ऑनलाईन प्रणालीवर आधारित महसूल,बँकिंग, प्रमाणपत्रे व इतर शासकीय कामे रखडली असून शेतकरी, विद्यार्थी व सामान्य नागरिक त्रस्त झाले आहेत.वारंवार तक्रारी करूनही बीएसएनएल प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.जर तात्काळ बीएसएनएलची सेवा सुरळीत करण्यात आली नाही व सोयगाव येथे जबाबदार अधिकारी नियुक्त करण्यात आला नाही,तर संतप्त नागरिक व ग्राहक बीएसएनएल कार्यालयाला कुलूप ठोकण्याचा इशारा देत आहेत.

# द्राक्षबागांतील प्लास्टिक क्रॉप कव्हरबाबत सकारात्मक अहवाल शासनास सादर करणार

## हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर क्रॉप कव्हरचा वापर आवश्यक – अतिरिक्त सचिव विकासचंद्र रस्तोगी

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/ राहुल कुलकर्णी** : हवामानातील सातत्याने होत असलेल्या बदलांमुळे द्राक्ष पिकाच्या उत्पादनावर व गुणवत्तेवर मोठा परिणाम होत असून, त्यावर प्रभावी उपाय म्हणून द्राक्षबागांमध्ये प्लास्टिक क्रॉप कव्हरचा वापर अत्यंत आवश्यक ठरत आहे. या पार्श्वभूमीवर प्रत्यक्ष क्षेत्रीय पाहणी करून द्राक्ष बागाईतदार संघाने मांडलेल्या अडचणी, उपाययोजना व शिफारशींचा सविस्तर व सकारात्मक अहवाल शासनाकडे सादर करून तो मंत्र्यांसमोर मांडण्यात येईल, असे स्पष्टिकरण महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाचे अतिरिक्त सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी केले.

अतिरिक्त सचिव रस्तोगी यांनी नुकतीच नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी,



मालेगाव व सटाणा या प्रमुख द्राक्ष उत्पादन क्षेत्रांतील प्लास्टिक क्रॉप कव्हर वापरलेल्या द्राक्षबागांना प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. या पाहणीदरम्यान त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत उत्पादन खर्च, हवामानातील जोखीम, कीड-रोगांचा प्रादुर्भाव तसेच क्रॉप कव्हरमुळे होणारे फायदे व अडचणी यांची सखोल माहिती घेतली.

यानंतर ओझर येथील महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागाईतदार संघाच्या कार्यालयात आयोजित बैठकीत द्राक्ष उत्पादक, कृषी तज्ज्ञ व अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी संघाचे अध्यक्ष कैलासराव भोसले यांनी अतिरिक्त सचिव रस्तोगी यांचे स्वागत केले. बैठकीत द्राक्ष बागाईतदार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी अवकाळी पाऊस, गारपीट, अतिउष्णता, आर्द्रतेतील वाढ यांसारख्या हवामान बदलांचा द्राक्ष पिकावर होणारा दुष्परिणाम मांडला. या समस्यांवर मात करण्यासाठी प्लास्टिक क्रॉप कव्हर हे शाश्वत व प्रभावी तंत्रज्ञान असून त्यासाठी शासनस्तरावर ठोस धोरण व सहाय्य आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी बोलताना अतिरिक्त सचिव रस्तोगी म्हणाले की, “द्राक्ष बागाईतदारांनी मांडलेल्या अडचणी, खर्चाचा ताण, तसेच क्रॉप कव्हरच्या वापरामुळे उत्पादन व गुणवत्तेत होणारी सुधारणा यांचा सखोल अभ्यास करण्यात येईल. प्रत्यक्ष क्षेत्रीय पाहणीतील अनुभव, तज्ज्ञांचे मत आणि संघाच्या शिफारशींच्या आधारे सकारात्मक अहवाल तयार करून तो शासनाकडे सादर केला जाईल व संबंधित मंत्र्यांसमोर मांडण्यात येईल.”

या बैठकीस राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, पुणे येथील डॉ. अजयकुमार उपाध्याय, कृषी विभागाचे जिल्हा अधीक्षक रविंद्रजी माने, काळभोर, महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागाईतदार संघाचे अध्यक्ष कैलासराव भोसले, नाशिक विभाग अध्यक्ष बाळासाहेब गडाख, मानद सचिव बबनराव भालेराव, संचालक सुरेश कळमकर, बाळासाहेब वाघ, भारत सोनवणे, भाऊसाहेब गवळी यांच्यासह कृषी विभागाचे अधिकारी, तज्ज्ञ आणि मोठ्या संख्येने द्राक्ष बागाईतदार उपस्थित होते.

# मानवी हक्क दिनानिमित्त शांतता व ऐक्याचा संदेश

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे** : मानवी हक्क दिनानिमित्त स्पीड ऑफ पिस इंडिया आणि मुंबई बहाई समाज यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष समुदाय संमेलनाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात स्पीड ऑफ पिस चे माजी विद्यार्थी, शिक्षक, पालक, विद्यार्थी तसेच बहाई समाजातील सदस्य असे जवळपास १०० जण सहभागी झाले होते. शांतता, न्याय आणि मानवतेच्या ऐक्याबद्दलची समान बांधिलकी व्यक्त करत उपस्थितांनी एकात्मतेच्या भावनेत सहभाग घेतला.

दोन्ही समुदायांच्या समान मूल्यांवर आधारित या संमेलनात शांतता, समता, बंधुता आणि न्याय या मानवी हक्कांच्या जिवंत अभिव्यक्तींवर चिंतन करण्यात आले. सागर गांगुर्डे, प्रोग्राम्स मॅनेजर उर्मी



चंदा आणि मुंबई बहाई समाजाच्या नर्गिस गौर यांच्या संयुक्त आयोजनातून हा कार्यक्रम साकारला गेला. मानवी हक्क कार्यकर्ते ॲड. विनोद शेट्टी यांनी सत्तेचा गैरवापर आणि मानवी हक्कांचे होत असलेले उल्लंघन यावर प्रकाश टाकला.

बहाई दृष्टिकोन मांडताना ॲड. जेना सुनावाला यांनी शांतता ही केवळ स्वप्न नसून अटळ आहे, असा विश्वास व्यक्त केला.

समाजपरिवर्तनात युवक आणि कनिष्ठ युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. पदवीदान समारंभ व मोठ्या संख्येतील उपस्थितीने संवाद, शिक्षण आणि ऐक्याच्या माध्यमातून अधिक न्याय्य व सुसंवादी समाज घडवण्याचा सामूहिक संकल्प यावेळी करण्यात आला.

# पी.एम.किसानचे बंद पडलेले हप्ते पुन्हा सुरू करण्यासाठी विशेष मोहीम - कृषी अधिकारी शेळके

## १५ डिसेंबर ते २१ डिसेंबर २०२५ पर्यंत शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)** - पी.एम.किसान योजने अंतर्गत बंद पडलेले हप्ते पुन्हा सुरू करण्यासाठी विशेष मोहीम पाटोदा तालुका कृषी अधिकारी कार्यालयात सोमवार दिनांक १५ डिसेंबर २०२५ ते रविवार दिनांक २१ डिसेंबर २०२५ या कालावधीत पी.एम. किसान योजने अंतर्गत आधी सुरू असलेले परंतु आता बंद पडलेले शेतकरी लाभार्थींचे हप्ते पुन्हा चालू करण्यासाठी विशेष




मोहीम आयोजित करण्यात आली आहे. या मोहिमेच्या उद्देशाने पाटोदा तालुक्यातील सर्व शेतकरी आणि लाभार्थींनी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाला भेट देऊन बंद पडण्याची कारणे जाणून घ्यावीत. तसेच आवश्यक कागदपत्रांची माहिती घेऊन या आठवड्यामध्येच सर्व कागदपत्रे कार्यालयात जमा करावीत. बंद पडलेले हे हप्ते त्वरित पुन्हा सुरू करण्यासाठी हे महत्त्वाचे आहे.

त्यासाठी सोमवार दिनांक १५ डिसेंबर २०२५ ते रविवार दिनांक २१ डिसेंबर २०२५ या कालावधीत पाटोदा तालुका कृषी अधिकारी कार्यालय, पाटोदा.जि.बीड येथे लाभार्थींनी शेतकरी यांनी सकाळी १०:०० ते संध्याकाळी ५:३० या वेळेत कागदपत्रे सादर करावीत असे आवाहन पाटोदा तालुका कृषी अधिकारी ओंकार शेळके यांनी केले आहे.

# दुबईहून लग्नासाठी आलेल्या वडिलांसह नवरदेवाचा भीषण अपघात

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे/रेवदंडा प्रतिनिधी** : लग्नाच्या तोंडावर पिता-पुत्राचा भीषण अपघातात मृत्यू; गोरेगावमध्ये शोककळा , रायगड जिल्ह्यातील कोलाडजवळ मुंबई-गोवा महामार्गावर शनिवारी पहाटी शोकांत घटना घडली. अवघ्या काही दिवसांवर लग्न येऊन ठेपलेल्या तरुण ओवेस सरखोत (२५) आणि त्याच्या वडिलांचा कंटेनरशी धडक झाल्याने जागीच मृत्यू झाला. दुबईहून लग्नाच्या तयारीसाठी परत आलेल्या वडिलांना विमानतळावर घेण्यासाठी मुंबईत गेलेल्या या कुटुंबावर विघ्न आलं असून, गोरेगाव परिसरात शोककळा पसरली आहे.ओवेस सरखोत यांचं येत्या २९ डिसेंबर रोजी लग्न ठरलेलं होतं. त्याच्या वडील सज्जत सरखोत (५५) हे दुबईत कार्यरत असून, लग्नाच्या तयारीसाठी खास घरी परत आले होते. ओवेस आणि त्याचा धाकटा भाऊ सरजीच (२०) यांनी वडिलांना घेऊन कारने गोरेगावकडे परतत असताना कोलाडजवळील पुई गावाच्या हद्दीत पुढे



जाणाऱ्या कंटेनरला मागून जोरदार धक्का दिला. धडकेत कार पूर्णपणे चक्काचूर झाली.घटनास्थळी कोलाड पोलीस आणि स्थानिक नागरिकांनी तात्काळ धाव घेतली. तपासात ओवेस आणि सज्जत सरखोत यांचा जागीच मृत्यू झाल्याचं स्पष्ट झालं. अपघातात कारचालक उस्मान कारविलकर (२१) आणि सरजीच सरखोत (२०) हे गंभीर जखमी झाले असून, त्यांना कोलाड व माणगाव येथील रुग्णालयात दाखल करण्यात आलं. दोघांचीही प्रकृती चिंताजनक आहे.पोलिसांनी नोंद घेतली असून, अपघाताचं कारण तपासणीस सुरुवात झाली आहे. लग्नाच्या आनंदातून शोकात बदललेल्या या घटनेमुळे गोरेगाव गाव शोकमग्न झालं आहे.

# किल्ले बांधणी व रांगोळी स्पर्धेचे बक्षीस वितरण संप्पन्न

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील सणसर येथील शिवतेज शिवजयंती उत्सव तरुण मंडळ सणसर यांनी दिवाळीत मुलांना सुट्टी असते आणि त्यांना त्या सुट्टीच्या काळात आपल्या महाराष्ट्रातील असणारे किल्ल्याचा इतिहासाची माहिती होण्यासाठी किल्ला बांधणी स्पर्धेचे शिवतेज शिवजयंती तरुण मंडळ सणसर यांच्या माध्यमातून आयोजन करण्यात आले होते समाजातील सामाजिक भावना लक्षात घेऊन हा उपक्रम दरवर्षी घेतला जात असल्याची माहिती अध्यक्ष राहुल जगताप व कुलदीप निंबाळकर यांनी सांगितले.

ग्रामपंचायत कार्यालयातील



सभागृहात रविवार दि 14 डिसेंबर रोजी बक्षीस वितरण कार्यक्रम संप्पन्न झाला सणसर पंचक्रोशीतील सहभागी विध्यार्थी व पालक मोठया संख्येने उपस्थित होते योगेश गोरे विनायक निंबाळकर ऋतुराज निंबाळकर अक्षय निंबाळकर दिपक नेवसे बंडूकाका निंबाळकर जगदीश सोनार विनोद सपकळ आबासाहेब भोईटे बाबाराज रायते आदी दानशूर व्यक्तीनी बक्षीसासाठी मदत केली असल्याची माहिती सांगण्यात आली

यावेळी सणसर गावचे सरपंच यशवंत पाटील माहिती अधिकार समितीचे इंदापूर तालुका अध्यक्ष विकास क्षत्रिय भानुदास निंबाळकर युवा उदयोजक अक्षय निंबाळकर जाचकवस्ती गावचे तंटामुक्तीचे अध्यक्ष सुनील निंबाळकर किरण गायकवाड बंडूकाका निंबाळकर बाबाराज रायते विकास फुले यांच्या हस्ते मुलांना व मुलींना ट्रॉफी प्रशस्तीपत्रक रोख रक्कम देऊन बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी शिवतेज शिवजयंती उत्सव मंडळाचे अध्यक्ष राहूल जगताप उपाध्यक्ष कुलदीप निंबाळकर सोमनाथ राजेभोसले विक्रम निंबाळकर अतुल घोडे निखिल भोसले गणेश भोसले निलेश भाग्यवंत व मंडळाचे सर्व कार्यकर्ते व मुले मुली फार मोठया प्रमाणात उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश पवार व आभार सोमनाथ राजेभोसले यांनी केले

# गोळेगावात जुई नदीवर उभारले सात 'वनराई बंधारे'

## स्वामी नरेंद्राचार्यजी महाराजांच्या संकल्पनेंतर्गत स्तुत्य उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड** : जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या 'कच्चे वनराई बंधारे बांधणे' अभियानांतर्गत सिल्लोड तालुक्यातील गोळेगाव येथे भरीव कामगिरी करण्यात आली आहे. येथील जुई नदीवर गोळेगाव संतसंग सेवा केंद्राच्या वतीने तब्बल सात कच्चे वनराई बंधारे यशस्वीरित्या उभारण्यात आले आहेत. जलसंधारणाच्या या महत्त्वपूर्ण कार्याचे परिसरात कौतुक होत आहे.

या समाजोपयोगी उपक्रमाच्या ठिकाणी भाजपा प्रदेश चिटणीस तथा सिल्लोड-सोयगाव विधानसभा नेते सुरेशभाऊ बनकर यांनी विशेष भेट दिली. त्यांनी बंधाऱ्यांची पाहणी करून उपस्थित भक्तगणांशी संवाद साधला. स्वामीजींच्या संकल्पनेतून





अशाप्रकारे समाजासाठी उपयुक्त असलेले उपक्रम संपन्न होत असल्याबद्दल बनकर यांनी यावेळी समाधान व्यक्त केले व उपक्रमास शुभेच्छा दिल्या.

या श्रमदान आणि जलसंधारण कार्यात जिल्हा सेवा अध्यक्ष सुरेश गव्हाणे, सिल्लोड तालुका महिला अध्यक्षा ज्योती गव्हाणे, तालुका युवा अध्यक्ष अमोल झोंड यांनी पुढाकार घेतला. तसेच दयाराम चव्हाण, नारायण सोनवणे, ज्ञानेश्वर गव्हाणे, अशोक दुतोंडे, सुरेश राऊत, नितीन झोंड यांच्यासह मोठ्या संख्येने 'माऊली'चे भक्तगण उपस्थित होते व त्यांनी बंधारे उभारणीत सक्रिय सहभाग नोंदवला.

# सुंदर अक्षर व्यक्तिमत्व नव्हे तर भविष्य घडवते- इम्रान शेख

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय** : प्रियदर्शिनी इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज इंदापूर येथे सुंदर हस्ताक्षर स्पर्धा उत्साहात आजच्या तंत्रज्ञानाच्या युगातही सुंदर हस्ताक्षराचे महत्त्व कमी झाले नाही.लहानपणीच जर अक्षराकडे लक्ष दिले तर अक्षरासोबत व्यक्तिमत्व ही घडत जाते.व्यक्तिमत्त्वातून भविष्याचा मार्ग ही सुकर होतो, असे विचार संस्थेचे व्हा.चेअरमन इम्रान शेख यांनी मांडले.या शालेय हस्ताक्षर स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.सुंदर हस्ताक्षराचे महत्त्व अधोरेखित करण्याच्या उद्देशाने आयोजित



करण्यात आलेल्या या स्पर्धेत पहिली ते चौथी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी उत्साहात सहभाग घेतला.

स्पर्धकांनी दिलेल्या वेळेत एका विशिष्ट उताऱ्यांचे सुंदर आणि सुवाच्च अक्षरात अनेकांनी लेखन केले. यावेळी प्राचार्य श्री.सुधीर भिसे सर म्हणाले की, सुंदर हस्ताक्षर हे केवळ आपले विचार प्रभावीपणे मांडण्यास मदत करत नाही,तर आपले व्यक्तिमत्त्वही घडवते,सुंदर हस्ताक्षरांविषयी जागरुकता निर्माण होण्यास मदत होते.या वेळी स्पर्धेत परीक्षक म्हणून योगिता मॅडम,स्वाती मॅडम,खान मॅडम,शिंदे मॅडम,धनश्री मॅडम,नलवडे मॅडम,कुलकर्णी मॅडम व भिंगारदिवे सर यांनी काम पाहिले.

# विदर्भाला काय दिले यावरून सभागृहात गोंधळ

**दैनिक युवक आधार**

**नागपुर । प्रतिनिधी** - राज्याच्या विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशनाच्या आजच्या शेवटच्या दिवशी अंतिम आठवडा प्रस्तावाला उत्तर देत असताना विरोधकांनी विदर्भाला काय दिले अशी विचारणा करत सभागृहात गोंधळ घातला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस निवेदन मांडत असताना मुख्संयमंत्री फडणवीस यांनी संताप व्यक्त केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अंतिम आठवड्यातील भाषण सुरू असताना विरोधी पक्षाच्या आमदारांनी गदारोळ सुरू केला. यामुळे मुख्यमंत्री संतप्त झाले. ठाकरे शिवसेनेचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी त्यांच्या भाषणात व्यत्यय आणण्याचा प्रयत्न केला.तेव्हा मुख्यमंत्र्यांनी आमदार खरात यांना उद्देशून "तुम्ही पहिल्यांदा निवडून आलेले आहात. तुम्हाला या सभागृहाची शिस्त माहिती नाही. या सभागृहाचा डेकोरमही माहित नाही. अशा शब्दात खडसावले. सभागृहात जेव्हा मुख्यमंत्री किंवा सभागृहाचे नेते बोलतात, त्यावेळी एक शिस्त असते. मी जर तुलनात्मक बोलायला लागलो की मागच्या काळात विदर्भाला काय मिळालं आणि आता काय मिळालं, तर तोंड दाखवायला जागा राहणार नाही. त्यामुळे प्रत्येक गोष्टीत राजकारण करायचं नाही, लक्षात ठेवा. असे देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले. तरीही सभागृहात गदारोळ वाढत होता त्यामुळे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दोन वेळा खाली बसा, खाली बसा असे सांगितले अशा पद्धतीने काम होत ही पद्धत बरोबर नाही असे विरोधकांना बजावले असतानाही गोंधळ वाढतच होता अशातच मुख्यमंत्र्यांनी आपले निवेदन चालूच ठेवले.

मुख्यमंत्री आपल्या निवेदनात राज्याच्या विकासाचे व्हिजन, योजनांची अंमलबजावणी आणि ऐतिहासिक निर्णयांवर जोर दिला गेला.त्यांनी आपल्या भाषणात स्पष्ट केले की, "चंद्र सूर्य असेपर्यंत मुंबई महाराष्ट्रातच राहील. तसेच सीबीएसई अभ्यासक्रमात २१ पानांचा शिवरायांचा इतिहास समाविष्ट करण्यात आला आहे, अशी महत्वपुर्ण माहिती सभागृहात दिली.

महाराष्ट्राचे व्हिजन डॉक्युमेंट तयार केले आहे. यात २०४७ पर्यंत विकसित महाराष्ट्र कसा असेल याबद्दल प्रत्येक विभागाचा रोडमॅप आहे. त्याचे २०३०, २०३५ आणि २०४७ असे तीन टप्पे आहेत. असे सांगताना नागपुर गोंदिया द्रुतगती महामार्ग हा समृद्धी एक्सटेंशन करतोय. नाना भाऊंकडे लवकर पोहोचता यावे. नानांनी सांगितल्या प्रमाणे दोन बायपास देऊ. एकाने नाना, तर दुसऱ्याने प्रफुल्ल पटेल जातील. गडचिरोली व चंद्रपूर साठी एक कॉरिडॉर करतोय. त्यासाठी निधीची तरतूद केली आहे. नागपूर गोवा शक्तीपीठ महामार्ग आहे. त्याचा फायदा मराठवाड्याला होईल काही आक्षेप होते. त्यात एक खरा होता. सोलापूर पासून अलायमेंट ही राष्ट्रीय महामार्गाला समांतर जात होती. जोडली न केलेली ठिकाणे जोडता येतात. म्हणून सोलापूर पासून सांगली मार्ग जाणारी अलायमेंट करीत आहोत. जयंत पाटील सुटले होते, आता त्यांना जवळ आणले आहे असे मुख्यमंत्र्यांनी सांगताच एकच हश्या पिकला. या महामार्गामुळे ३२ जिल्ह्यांना कनेक्टिव्हिटी मिळणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. पुढे ते म्हणाले की,लातूर ते मुंबई हे अंतर साडेचार तासाचे होईल. अभिमन्यू पवार यांच्या मागणी नूसार हा मार्ग देण्यात आला. हा मार्ग ४५० किमीची लांबी आहे. ३६ हजार कोटींचा महामार्ग आहे. ठाणे, पुणे, बीड, अहिल्यानगर व लातूर हे जोडले जातील. बदलापूर जवळ टनेल केला आहे. त्यातून १५ मिनिटांत अटल सेतूवर जाता येईल. त्यामुळे २० मिनिटांनी मुंबई गाठता येईल. पुढे वाढवण बंदर व नवी मुंबई विमानतळ गाठता येईल.राज्याच्या विकासाचा रोडमॅप सादर करताना त्यांनी विविध रस्त्यांची माहिती दिली. गडचिरोली मध्ये आपण विमानतळ सुरु करतोय. गेट वे टु साऊथ इंडिया करायचे आहे. धावपट्टी तयार करायची आहे. महामार्गालगत एअरपोर्ट करतोय. सुधीर भाऊंना नागपूर ऐवजी चंद्रपूर मधूनच विमान मिळाले पाहिजे, असे मुख्यमंत्री म्हणाले. १ हजार नवीन फ्लाईट सुरु करतोय. अमरावती येथे पायलट ट्रेनिंग सेंटर सुरु करतोय. १० हजार पायलट आपल्याला लागणार आहेत. इंडिगोची समस्या त्याच मुळे झाली होती, असेही फडणवीस यांनी सभागृहात सांगितले.

मला विश्वास आहे की २०२९-२०३० मध्ये देशातील पहिली ट्रिलियन अर्थव्यवस्था महाराष्ट्राची असेल. त्या दृष्टीने आपले कार्य सुरु आहे, असा विश्वास मुख्यमंत्र्यानी व्यक्त केला. नवीन सरकार येऊन एक वर्ष झाले. आम्ही महायुतीमधील तिन्ही नेते एकत्रित निर्णय करतो. अंमलबजावणीचा प्रयत्न सातत्याने करतो. नगरपालिका निवडणुका झाल्या. महापालिका व जिल्हा परिषद होतील. अनेक वर्षे निवडणूक झाल्या नसल्याने कार्यकर्ते दुःखी होते. आता लोकशाही खालच्या स्तरापर्यंत पोहोचण्यास महाराष्ट्र गतीने काम करेल. मध्यंतरी महाराष्ट्राला भोगावे लागले. या सगळ्या गोष्टी विसरून जायच्या. कारण महाराष्ट्र आता थांबणार नाही. सकारात्मकतेने पुढे जायचा आमचा विचार आहे. विकासाचा अजेंडा निवडणूक मांडला. कुठेही टीका केली नाही. अमृतमहोत्सवी महाराष्ट्र घडविण्यासाठी वाटचाल करायची आहे. सभागृहातील दोन्ही बाजुच्या नेत्यांना आवाहन आहे. रचनात्मक कार्यातून महाराष्ट्राला पुढे नेऊ शकतो या हिताचा विचार करणारे आपण आहोत. महाराष्ट्राला पुढे नेण्याचा विचार करूयात, अशी भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडली.

निवडणुका झाल्यानंतर योजना बंद होतील, या विरोधकांच्या टीकेला उत्तर देताना फडणवीस यांनी ठामपणे उत्तर दिले. राज्य सरकारने सुरू केलेल्या लाडकी बहीण योजना आणि शेतकऱ्यांना मोफत वीज योजना यापैकी कोणतीही योजना बंद केलेली नाही. सर्व योजना सुरु आहेत. यापुढेही पुढील ५ वर्ष ही योजना सुरुच राहणार आहे, असे देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

## पनवेल महानगरपालिकेच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : पनवेल महानगरपालिकेच्या वतीने शहरातील विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण सोमवार, दिनांक 15 डिसेंबर 2025 रोजी सकाळी 8:30 वाजल्यापासून होणार आहे.या लोकार्पणाचा प्रमुख कार्यक्रम लोकनेते दि. बा. पाटील विद्यालय, पनवेल येथे दुपारी 1:00 वाजता संपन्न होणार आहे. महापालिका क्षेत्रातील नागरिकांनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी केले आहे.

महानगरपालिकेकडून कार्यक्रमास जिल्ह्यातील विविध मान्यवर लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व अधिकारी उपस्थित राहणार आहेत. पनवेल शहराच्या सर्वांगीण विकासासाठी महापालिकेकडून राबविण्यात येणाऱ्या या विकासकामांमुळे नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होऊन जीवनमान उंचावण्यासाठी मदत होणार आहे.

**पनवेल शहरातील विविध विकासकामांचे लोकार्पण**

1. पिसार्वे तलाव पुर्नज्जीवित व सुशोभिकरण कामाचे लोकार्पण

2. कोयनावेळे व घोट या गावांना जोडणाऱ्या रस्त्यावरील तळोजा नदीवरील पुलाचे लोकार्पण

3. प्रभाग समिती-अ, खारघर येथील प्रभाग कार्यालय लोकार्पण

4. खारघर येथे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे लोकार्पण

5. प्रभाग समिती ब कळंबोली नोड मधील आयडीबीआय बँक, सेक्टर- ८ ते सन शाईन सोसायटी पर्यंत काँक्रिटीकरण रस्त्यांचे लोकार्पण

6. प्रभाग समिती 'ब', कळंबोली येथील सेक्टर -८ई मधील प्रभाग कार्यालयाचे लोकार्पण

7. प्रभाग समिती क मधील कामोठे येथील सेक्टर-११ मध्ये प्रभाग कार्यालयाचे लोकार्पण

8. लोकनेते दि.बा. पाटील यांच्या बद्दल माहिती दर्शविणारे म्युरल व सुशोभित कक्ष (स्मारीका) कामाचे लोकार्पण

**विविध विकासकामांचे भूमिपूजन**

1. नवीन पनवेल पश्चिम सेक्टर- १८ माता व बालसंगोपन केंद्राचे भूमीपूजन

2. प्रधानमंत्री आवास योजना व मुख्यमंत्री आवास योजने अंतर्गत पनवेल बस स्थानकामागे कुष्ठरोग पिडीतांसाठी व खुल्या विक्रीसाठी प्रस्तावित गृहप्रकल्पांचे बांधकामाचे भूमीपूजन

## मुंबईच्या तिजोरीवर दरोडा टाकणारे 'रेहमान डकैत' कोण..?

### महानगरपालिका निवडणूक जिंकून महायुतीच ठरेल असली ' धुरंधर '

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची उबाठा प्रमुखांवर घणाघाती टीका

**दैनिक युवक आधार**

**नागपूर / प्रतिनिधी :** मुंबईच्या तिजोरीवर दरोडा टाकणारे रेहमान डकैत कोण आहेत..? त्यांना गाडून आगामी महानगरपालिका निवडणुकीत महायुतीच खरी धुरंधर ठरेल असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. हिवाळी अधिवेशनाच्या अंतिम आठवडा प्रस्तावाला उत्तर देताना त्यांनी अधिवेशन काळात झालेल्या टीकेला आपल्या भाषणातून जशास तसे प्रत्युत्तर दिले. यावेळी बोलताना, आम्ही विकासकामांचा आणि कल्याणकारी योजनांचा धडाका सुरू ठेवला असून विरोधकांना मात्र बिनबुडाचे आरोप करण्यावाचून काहीही काम शिल्लक राहिलेले नाही असे सांगितले. काही जण अंगात नाही बळ आणि चिमटा काढून पळ.. असे वागत आहेत..फक्त पर्यटनासाठी नागपुरात येतात, आज आरायवल आणि उद्या डीपारचर अशी त्यांची अवस्था आहे.. ते आले पण अधिवेशात एकही प्रश्न विचारला नाही, एकाही विषयावर सभागृहात बोलले नाहीत, त्यामुळे जनतेच्या प्रश्नासाठी ते किती जागरूक आहेत तेच यातून दिसून आले असल्याचे शिंदे यांनी सांगितले. लोकांचे प्रश्न सोडून फक्त विरोधी पक्षनेतेपद द्या यासाठीच त्यांचा प्रयत्न सुरू होता. मात्र विरोधी पक्षनेता होण्यासाठी निदान तेवढे उमेदवार निवडून यावे लागतात तुम्हाला जनतेनेच विरोधी पक्षनेतेपदापासून दूर ठेवले असल्याचे सांगितले.उपमुख्यमंत्रीपद रद्द करा अशी मागणी करत त्यांनी माध्यमांमध्ये आदळ आपट केली, मात्र स्वतः मुख्यमंत्रिपदाची शपथ घेताना आपल्या मंत्रीमंडळात उपमुख्यमंत्रीपद ठेवले होते याचा त्यांना सोयीस्कररित्या विसर पडला असे सांगितले. माझ्याविषयी असलेल्या मळमळ आणि जळजळ यातूनच हे आरोप होत असल्याचे आवर्जून नमूद केले. मुंबईकरांसाठी आम्ही ऐतिहासिक निर्णय घेतले, मुंबईतील ओसी नसलेल्या २० हजार इमारतींना दिलासा दिला, मुंबईला पागडीमुक्त करण्याचा निर्णय घेतला, त्यातून १३ हजार इमारतीच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा झाला. नॅशनल पार्क मधील २५ हजार कर्मचाऱ्यांना ५किमी परिसरात पर्यायी घरे देण्याची योजना आणली, मुंबईतील गिरण्यांच्या जागेवरील चाळींच्या पुनर्विकासासाठी नियमावलीमध्ये बदल केले, सिडकोचा घरांच्या किंमती कमी करून १० टक्क्यांनी या किंमती कमी केल्या, ५० एकरापेक्षा मोठ्या भूखंडावर क्लस्टर पुनर्विकास योजना राबवण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये पहिल्या टप्यात १७ प्रकल्पांची निवड केली आहे. सर्वसामान्य लोकांना दिलासा मिळावा असे अनेक निर्णय घेतले. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या ४० लक्ष झोपडपट्टीवासीयांना घरे उपलब्ध करून देण्याचे स्वप्न आम्ही पूर्ण करत आहोत असे सांगितले. या निर्णयाद्वारे २३ जानेवारी रोजी सुरू होणाऱ्या बाळासाहेबांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त या योजना सुरू करून आम्ही त्यांच्या चरणी ही योजनापुष्पे वाहिली आहेत असे शिंदे यांनी स्पष्ट केले.मात्र एवढी वर्षे मुंबईत ज्यांची सत्ता होती त्यांनी नक्की काय केले..? मुंबई तोडणार तोडणार एवढेच तुणतुणे कायम वाजवले. मिठी असो वा कोविड कुठेही डाका टाकायचे सोडले नाही. तिजोरीला वेटोळे घालून प्रत्येक कामात घोटाळे करण्याचे काम केले. त्यामुळे मुंबईच्या तिजोरीवर डाका घालून स्वतःची तिजोरी भरणारा खरा रेहमान डकैत कोण आहे..? ते लोकांसमोर यायला हवे. अशा रेहमान डकैतना पाणी पाजणारी 'धुरंधर' महायुतीच असेल असे शिंदे यांनी स्पष्ट केले.

## २५ वर्षांच्या मौनाला छेद देत मातेरेवाडीची पुरातन बारव पुन्हा जिवंत

### इतिहास जपण्याचा तरुणाईचा निर्धार; ग्रामपंचायत व सार्वजनिक वाचनालयाचा आदर्श उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी कृष्णा गायकवाड(पिंपळगाव बसवंत) :** गावाच्या इतिहासाची साक्ष देणारी, अनेक पिढ्यांची तहान भागवणारी मातेरेवाडीतील ऐतिहासिक व पुरातन बारव तब्बल २५ वर्षांच्या दुर्लक्षानंतर पुन्हा स्वच्छ करण्यात आली. ग्रामपंचायत मातेरेवाडी आणि सार्वजनिक वाचनालय मातेरेवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या या स्वच्छता मोहिमेमुळे गावाच्या स्मृतींना नवा श्वास मिळाला आहे.



काळाच्या ओघात झाडाझुडपांनी वेढलेली, माती-कचऱ्याखाली गाडली गेलेली ही बारव आज पुन्हा मोकळा श्वास घेताना दिसत आहे. ही केवळ स्वच्छता मोहीम नव्हे, तर गावाच्या सांस्कृतिक वारशाला वाचविण्याची एक भावनिक चळवळ ठरली. गावकऱ्यांच्या आठवणींमध्ये जिवंत असलेली ही बारव पुन्हा एकदा आशेचे आणि जतनाचे प्रतीक बनली आहे.

या उपक्रमात सार्वजनिक वाचनालय मातेरेवाडीचे अध्यक्ष विक्रांत (आप्पा) सूर्यवंशी, उपाध्यक्ष विक्रम पवार, खजिनदार विजय कोकाटे, सचिव सोमनाथ गांगुर्डे यांच्यासह अमोल भाऊ कोकाटे, राहुल गायकवाड, अंकुश गांगुर्डे, प्रतीक दुगजे, नवनाथ गायकवाड, दीपक गांगुर्डे आदी तरुणांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. कष्ट, घाम आणि श्रम यांची पर्वा न करता तरुणाईने इतिहासाच्या या ठेव्याला स्वच्छतेची भेट दिली.

ग्रामपंचायत मातेरेवाडीने या मोहिमेस मोलाचे सहकार्य करत सामाजिक जबाबदारीचे दर्शन घडवले. "इतिहास जपणे ही काळाची गरज आहे" हा संदेश या उपक्रमातून ठळकपणे पुढे आला. गावातील नागरिकांनीही या कार्याचे मनापासून कौतुक करत पुढील टप्प्यात बारव संवर्धनासाठी सहकार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

२५ वर्षांनंतर पुन्हा उघडलेली ही बारव मातेरेवाडीच्या गौरवशाली भूतकाळाची साक्ष देत आहे. आजची तरुण पिढी जर इतिहासाशी अशी नाळ जोडत असेल, तर येणाऱ्या पिढ्यांना अभिमानाने सांगता येईल — आम्ही आमचा वारसा वाचवला आहे.

## द्राक्षबागांतील क्रॉप कव्हरबाबत सकारात्मक अहवाल सादर करणार

### ओझर येथे द्राक्ष बागाईतदार संघाच्या कार्यालयात कृषी विभागाचे अतिरिक्त सचिव विकासचंद्र रस्तोगी यांचे स्पष्टीकरण

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे /निफाड तालुका प्रतिनिधी :** द्राक्षबागांमध्ये वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक क्रॉप कव्हरबाबत प्रत्यक्ष क्षेत्रीय पाहणी करून, द्राक्ष बागाईतदार संघाने मांडलेल्या अडचणी, उपाययोजना व शिफारशींचा सकारात्मक अहवाल शासनाला सादर करून तो मंत्र्यांसमोर मांडण्यात येईल, असे स्पष्टीकरण महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाचे अतिरिक्त सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी दिले.

रस्तोगी यांनी नुकतीच नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी, मालेगाव व सटाणा तालुक्यांतील प्लास्टिक क्रॉप कव्हर असलेल्या द्राक्षबागांना प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली.




त्यानंतर ओझर येथील द्राक्ष बागाईतदार संघाच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत त्यांनी द्राक्ष उत्पादकांशी संवाद साधला.

यावेळी महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागाईतदार संघाचे अध्यक्ष कैलासराव भोसले यांनी त्यांचे स्वागत केले.

बैठकी दरम्यान द्राक्ष उत्पादनावर हवामान बदलांचा वाढता परिणाम होत असून, त्यावर उपाय म्हणून प्लास्टिक क्रॉप कव्हरचा वापर अत्यावश्यक असल्याचे संघाच्या पदाधिकाऱ्यांनी निदर्शनास आणून दिले.

या संदर्भात येणाऱ्या अडचणी, खर्च, तांत्रिक बाबी व शासकीय धोरणात्मक सुधारणा याविषयी सविस्तर चर्चा झाली. या सर्व मुद्द्यांचा अभ्यास करून शासनस्तरावर सकारात्मक अहवाल सादर करण्यात येईल, असे रस्तोगी यांनी स्पष्ट केले.

यावेळी राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, पुणे येथील डॉ. अजयकुमार उपाध्याय, कृषी विभागाचे जिल्हा अधीक्षक रविंद्रजी माने, काळभोर, द्राक्ष बागाईतदार संघाचे अध्यक्ष कैलासराव भोसले, नाशिक विभागाध्यक्ष बाळासाहेब गडाख, मानद सचिव बबनराव भालेराव, संचालक सुरेश कळमकर, बाळासाहेब वाघ, भारत सोनवणे, भाऊसाहेब गवळी यांच्यासह कृषी विभागाचे अधिकारी, तज्ज्ञ व द्राक्ष बागाईतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जाफराबादमध्ये 'नवोदय' ची परीक्षा सुरळीत

**दैनिक युवक आधार**

**जाफराबाद टेंभूर्णी प्रतिनिधी/अनिल ससाने** : जवाहर नवोदय विद्यालय निवड चाचणी परीक्षा शनिवारी १३ डिसेंबर रोजी सुरळीत पार पडली जालना जिल्ह्यात एकूण११ हजार २९७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली तर ६७० विद्यार्थ्यांनी पाठ फिरवली जवाहर नवोदय विद्यालय इयत्ता साहवीसाठी ही परीक्षा घेण्यात आली जाफराबाद तालुक्यामध्ये नवोदयसाठी एकुण ११०४ विद्यार्थ्यांनी प्रवेश पत्र भरले होते त्यापैकी ५३ विद्यार्थी गैरहजर होते परीक्षा केंद्रावर पोलीस बंदोबस्त व आरोग्य पथक बैठे पथक हजर होते व परीक्षा अतिशय चांगल्या वातावरणात सुरळीत पार पडली.

नवोदय विद्यालय समिति
प्रज्ञानं ब्रह्म

## जाहीर नोटीस

मी तुषार विजय बारमासे, वय 31वर्ष, धंदा: खाजगी नोकरी, राहणार प्लॉट नं. 102 बारशे नगर, पाचपावली, ध्यान संग्रह वाचनालया जवळ, नागपूर याद्वारे कळवू इच्छितो की नागपूर सुधार प्रण्यास व नागपूर महानगरपालिकेच्या हद्दीतील खचरा नं. 36 / 1 व 130/8 यात पडलेल्या ले आऊट मधील प्लॉट नं. 8 असून लांबी रुंदी पूर्व- पश्चिम 30 फूट आणि उत्तर- दक्षिण 35 फूट असून याचे संपूर्ण क्षेत्रफळ1050 चौरस फूट असून याचा सिटी सर्वे नं.274 व 275 आहे. वरील प्लॉट विक्री करारनामा केला असून यावर कुणाचे काही ऑब्जेक्शन असल्यास सात दिवसाच्या आत वरील दिलेल्या पत्त्यावर कळवावे त्यानंतर कुठलाही आक्षेप ग्राह्य धरण्यात येणार नाही करिता ही नोटीस.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# थोडक्यात

## नातेवाईकांनी दागिने चोरले

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : घरी पाहुणे म्हणून राहावयास आलेल्या नातेवाईकांनी दागिने चोरून नेल्याची घटना विचुंबे येथे घडली. याप्रकरणी 9 डिसेंबर रोजी खांदेश्वर पोलीस ठाण्यात दोघां विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला राधिका चौहान या विचुंबे येथे राहत असून त्यांचे दोन नातेवाईक पाच डिसेंबर रोजी त्यांच्या घरी आले त्यांनी जेवण करून घरी मुक्काम केला आणि घरातील सर्व झोपी गेले. सकाळी राधिका उठल्या असता त्यांना मोबाईल दिसून आला नाही. तसेच त्यांचे नातेवाईक झोपलेले दिसले नाहीत. भिंतीच्या खिळयाला टांगून ठेवलेली बॅग देखील सापडली नाही. आणि साहित्य विस्कटलेले दिसले. रोख रक्कम 15 हजार, सोन्याचे दागिने, चांदीच्या अंगठ्या, मोबाईल, मनगटी घड्याळ, एटीएम कार्ड सापडून आले नाहीत. त्यामुळे दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## नोकरीला न लावता साडेचार लाखांची केली फसवणूक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** नोकरीला न लावता महिलेची साडेचार लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी अनिकेत धनंजय पाठक (राहणार समता नगर, दौंड, पुणे) यांच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात आठ डिसेंबर रोजी होणारा दाखल करण्यात आला. माया गायकवाड ह्या खांदा कॉलनी येथे राहत असून त्यांची ओळख अनिकेत पाठक यांच्याशी झाली. यावेळी त्यांना सरकारी नोकरी लावतो असे त्यांनी सांगितले. आणि पाच लाख रुपयांची मागणी केली. त्यानंतर त्याने एक लाख रुपये मागितले. ते पैसे पाठवण्यात आले. पाठक यांनी वारंवार फोन करून राहिलेले पैसे पुढच्या पार्टीला द्यायचे आहेत असे सांगून पाठक यांच्या बँक खात्यात साडेतीन लाख रुपये पाठवण्यात आले. त्यानंतर कामावर हजर होण्यासाठी दुसरी ऑर्डर घेऊन आला आणि रेल्वे स्टेशन बाहेर ऑर्डर दिली. काही दिवसांनी औरंगाबाद येथे झालेली भरती घोटाळा उघडकीस आला आहे त्यामुळे काम होणार नाही पैसे परत करतो असे सांगितले आणि 19 ऑगस्ट रोजी पाच लाखांचा चेक दिला. चेक बँकेत टाकला मात्र तो बाउन्स झाला. पाठक याच्याकडे वारंवार पैसे मागितले मात्र उडवा उडवीची उत्तरे दिली.

## विमानतळ क्षेत्रात अनधिकृतपणे प्रवेश केल्या प्रकरणी गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** नवी मुंबई इंटरनॅशनल विमानतळाच्या वॉच टॉवर सहा आणि सातच्या मधील संरक्षित भिंत ओलांडून प्रतिबंधित केलेल्या क्षेत्रात अनधिकृतपणे प्रवेश केल्याप्रकरणी बिरबल कुमार साह (25 राहणार लेबर कॅम्प, संडे गेट जवळ, नवी मुंबई विमानतळ, पनवेल) याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात 11 डिसेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.11 डिसेंबर च्या दरम्यान एक अनोळखी इसम ईस्ट सीसीआर टर्निंग एरिया फिरत असल्याचा मेसेज वायरलेस वरून प्राप्त झाला. त्यावेळी त्याला ड्युटीवरील नागरिकांनी पकडून ठेवले होते. सीसीटीव्ही फुटेज मध्ये विमानतळाच्या संरक्षित भिंत ओलांडून आत मध्ये प्रवेश केल्याचे दिसून आले.

## तरुणाला लाथाबुक्क्यांनी मारहाण करून चाकूने वार करून केले जखमी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** दोघांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करून चाकूने वार करून जखमी केल्याप्रकरणी तिघांविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गौरव दीपक काकडे (वय 28 राहणार कामोठे, सेक्टर नऊ ) हा त्याचा मित्र फैजान मुलानी (राहणार कामोठे) हे ऐश्वर्या हॉटेल, सेक्टर 20 येथे भेटले आणि मोटरसायकल वर बसून सेक्टर सहा येथील बाळूमामा भोजनालय येथे गेले. जेवण केल्यानंतर ते पान टपरीवर गेले. त्या ठिकाणी समर्थ मोरे, प्रतीक साठे, आणि आर्यन उभे होते. ते सिगारेट ओढू लागले. यावेळी समर्थ मोरे हा गौरवच्या जवळ आला आणि त्या दिवशी मला शिवी का दिली असे बोलला. यावेळी शिवी दिली असेल तर माफी मागतो असे गौरव बोलला. यावेळी मोरेने मारण्यासाठी दगड उचलला त्याला अडवले. त्यानंतर आर्यन याने चाकू काढला आणि उजव्या हातावर गौरवच्या वार केला. फैजान सोडवण्यासाठी आला असता समर्थ, आर्यन आणि प्रतिक याने फैजानला कमरेच्या पट्ट्याने आणि लाथा बुक्क्याने मारहाण केली तसेच त्याच्या छातीवर, पोटावर चाकूने वार करून जखमी केले आणि ते निघून गेले.

## विवाहितेवर अत्याचार प्रकरणी आरोपी विरोधात गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** तळोजा परिसरात राहणाऱ्या तीस वर्षीय विवाहितेवर अत्याचार केल्याप्रकरणी आरोपी संदीप (पूर्ण नाव माहिती नाही) याच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात 12 डिसेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. तीस वर्षीय विवाहित महिला पती आणि मुलासह राहत असून आरोपी संदीप याने महिलेला मे महिन्यात प्रपोज केला. यावेळी महिलेने नकार दिला. त्यानंतर जून 2025 मध्ये महिलेच्या घरात प्रवेश करून आरोपीने तिच्यावर अत्याचार केला आणि लहान मुलाला आणि पिडीतेला मारण्याची धमकी दिली. त्यानंतर जुलै महिन्यात पुन्हा अत्याचार केला. आरोपीने पिडीतेला रस्त्यामध्ये गाठून तिच्या कुटुंबाला संपवण्याची धमकी दिली. याबाबत तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

# मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते 'विकसित भारत – पेंटिंग प्रदर्शन'चे उद्घाटन

## "कलाकार कट्टा" या उपक्रमाचे उद्घाटन



**दैनिक युवक आधार**

**नागपूर / प्रतिनिधी :** भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्या "सेवा पर्व–२०२५" उपक्रमांतर्गत दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, नागपूर आणि शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय,नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "विकसित भारताचा दृष्टिकोन" या संकल्पनेवर आधारित पेंटिंग कार्यशाळेत साकारलेल्या कलाकृतींच्या प्रदर्शनाचे उद्घाटन आज उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यशाळेत नागपूरसह महाराष्ट्रातील विविध शहरांमधील १०० हून अधिक व्यावसायिक कलाकारांनी सहभाग घेतला. "विकसित भारत" या संकल्पनेवर आधारित सामाजिक, सांस्कृतिक व विकासात्मक विचार कलाकारांनी आपल्या कलाकृतींतून प्रभावीपणे मांडले. कार्यशाळेच्या पार्श्वभूमीवर तयार झालेल्या निवडक ५० उत्कृष्ट कलाकृतींचे प्रदर्शन शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालयाच्या कलादालनात आयोजित करण्यात आले असून, मंत्री पाटील यांनी या कलाकृतींची सखोल पाहणी केली.

प्रदर्शनातील निवडक पेंटिंग्जची पहाणी करून मंत्री श्री पाटील यांनी कलाकारांशी व विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला. 'विकसित भारत' ही संकल्पना विविध माध्यमांतून कशी अभिव्यक्त केली आहे, याबाबत त्यांनी सविस्तर माहिती घेत कलाकारांच्या सर्जनशीलतेचे मनापासून कौतुक केले.

यावेळी त्यांनी महाविद्यालयातील फोटोग्राफी विभागास भेट देऊन विद्यार्थ्यांकडून फोटो शूट करून घेतले. तसेच प्रिंटमेकिंग विभागास भेट देत लिथोग्राफी प्रक्रियेतील तांत्रिक बाबी विद्यार्थ्यांकडून जाणून घेतल्या. विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक कौशल्यांचे विशेष कौतुक करत त्यांनी चॉकलेट देऊन प्रोत्साहन दिले.

या प्रसंगी मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते "कलाकार कट्टा" या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. महाविद्यालयाच्या कॅम्पसच्या बाहेर नुकत्याच सुरू करण्यात आलेल्या 'कलाकट्टा' या आउटडोअर गॅलरीमध्ये बी.एफ.ए. (अप्लाइड आर्ट) विभागाच्या विद्यार्थ्यांनी सामाजिक जाणीव या विषयावर आधारित पोस्टर्स प्रदर्शित केल्या आहेत.

भारताच्या सांस्कृतिक, शैक्षणिक आणि सामाजिक विकासात कला शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन करत मंत्री पाटील म्हणाले की, कला क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी आधुनिक तंत्रज्ञान, व्यावसायिक संधी आणि आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनस्तरावर सकारात्मक प्रयत्न केले जातील.

या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य कला संचालनालयाचे संचालक डॉ. किशोर इंगळे, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाचे संचालक विनोद दांडगे, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. विश्वनाथ साबळे, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालयाचे प्राध्यापक, विद्यार्थी व कलाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यशाळा व कला प्रदर्शनीमध्ये सहभागी झालेल्या सर्व कलाकारांचे मंत्री श्री पाटील यांनी कौतुक करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

## रेशनच्या गव्हाचा दर्जा घसरला!

### सिल्लोड तालुक्यात किड लागलेले, सडलेले धान्य वाटप शेतकऱ्यांच्या अन्नसुरक्षेवरच प्रश्नचिन्ह; प्राण्यांसाठीही अयोग्य गहू नागरिकांच्या माथी !



**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत गोरगरिबांना वितरित केल्या जाणाऱ्या रेशन धान्याच्या गुणवत्तेबद्दल सिल्लोड तालुक्यात गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. येथील लाभार्थ्यांना वाटप करण्यात येत असलेला गहू अत्यंत निकृष्ट दर्जाचा असून, त्याला कीड लागलेली आहे आणि तो सडलेला अवस्थेत असल्याचे समोर आले आहे.प्राप्त झालेल्या माहितीनुसार, रेशन दुकानातून मिळणारे हे धान्य मानवाच्या तर सोडाच, पण चारीसाठी वापरले जाणाऱ्या प्राण्यांनाही खाण्यासाठी योग्य नाही, अशी तक्रार लाभार्थी नागरिकांनी केली आहे. धान्य वितरणाच्या नियमांनुसार चांगल्या प्रतीचे, स्वच्छ आणि उपभोगयोग्य धान्य देणे बंधनकारक असताना, या गव्हाचा दर्जा पाहून प्रशासनाच्या धान्य साठवणूक आणि तपासणी प्रक्रियेवर संशय निर्माण झाला आहे."पोटाची भूक भागवण्यासाठी मिळालेला गहू जर असा किडका आणि सडलेला असेल, तर गरीब लोकांनी जगायचं कसं?" असा संतप्त सवाल एका लाभार्थी महिलेने उपस्थित केला आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, हा गहू इतका खराब आहे की तो दळल्यानंतर पीठ काळपट होते आणि त्याची चव पूर्णपणे बिघडलेली असते. यामुळे अनेक कुटुंबांनी हा गहू वापरणे बंद केले आहे.सिल्लोड तालुक्यात रेशन व्यवस्थेत सुरू असलेला हा 'धुडगूस' तत्काळ थांबवावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे. नागरिकांच्या मूलभूत अन्नसुरक्षेचा प्रश्न असल्याने, जिल्हा पुरवठा अधिकारी आणि तालुका प्रशासनाने या गंभीर प्रकरणाची तातडीने चौकशी करून, निकृष्ट धान्य पुरवठ्यासाठी जबाबदार असलेल्यांवर कठोर कारवाई करावी आणि लाभार्थ्यांना उत्कृष्ट दर्जाचा गहू त्वरित उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे. अन्यथा, नागरिक या विरोधात मोठे आंदोलन छेडण्याच्या पवित्र्यात आहेत.

## हिवाळी अधिवेशनात देगलूर–बिलोली मतदार संघातील रस्त्यांच्या दुरवस्थेवर सरकारचे वेधले लक्ष




**दैनिक युवक आधार**

**देगलूर वार्ताहर :** अतिवृष्टी व पूरपरिस्थितीमुळे देगलूर–बिलोली मतदारसंघातील रस्त्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर त्याचा गंभीर परिणाम होत आहे.ही परिस्थिती लक्षात घेता रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करून त्यासाठी विशेष व भरीव निधी त्वरित उपलब्ध करून द्यावा,अशी ठाम आणि पोटतिडकीची मागणी आमदार जितेश रावसाहेब अंतापूरकर यांनी महाराष्ट्र विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात सभागृहात केली.देगलूर मतदारसंघ हा महाराष्ट्र,कर्नाटक आणि तेलंगणा या तीन राज्यांच्या सीमेलगत असल्याने या भागातून दररोज मोठ्या प्रमाणावर वाहतूक व दळणवळण होते.मात्र यंदाच्या अतिवृष्टीमुळे देगलूर–हाणेगाव ते राज्यसीमा,बल्लूर–मानूर, देगलूर–कावळगड्डा,नरगंल–उमर सांगवी ते राज्यसीमा,बिलोली–आरळी–गुजरी–कांगठी ते खपराळा,बडूर–चिंचाळा ते भोसी, बिलोली–लघूळ ते सगरोळी, कुंडलवाडी–डौर ते बेळकोणी आदी प्रमुख रस्त्यांची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे.

या रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले असून अनेक ठिकाणी रस्ते खचले आहेत,तर काही ठिकाणी पूल वाहून गेले आहेत.परिणामी वाहनधारक,शालेय विद्यार्थी,शेतकरी तसेच रुग्णवाहिका व आपत्कालीन सेवांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे, अशी गंभीर बाब आ.अंतापूरकर यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली.हे रस्ते केवळ स्थानिक वाहतुकीसाठी नव्हे, तर सीमावर्ती व्यापार, शेतीमाल वाहतूक आणि आरोग्यसेवांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. मात्र प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे परिस्थिती अधिकच गंभीर होत असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेशी तडजोड होत आहे. त्यामुळे शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने विशेष निधी मंजूर करावा,अशी ठाम मागणी त्यांनी केली.सीमावर्ती भागाचा विकास म्हणजे राज्याच्या विकासाचा कणा असल्याचे अधोरेखित करत, देगलूर–बिलोली मतदारसंघातील रस्त्यांचा प्रश्न प्राधान्याने सोडवावा, अशी मागणी यावेळी आ.जितेश अंतापूरकर यांनी केली.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कारार्थी यांची सामाजिक न्यायमंत्री यांच्या कडे मागण्या



**दैनिक युवक आधार**

**नागपुर / प्रतिनिधी :** सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांना शिष्टमंडळाने भेटून गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्रातील दलित मित्र व डॉ बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार्थी यांच्या मागण्या प्रलंबित आहेत त्या लवकरात लवकर सोडविण्यासाठी लेखी निवेदन दिले.त्यात प्रामुख्याने समाज भूषण पुरस्कार्थी यांना आरोग्य सेवा मोठ्या हॉस्पिटल मध्ये निःशुल्क द्यावे,मानधन १०,०००/ रूपये द्यावे, दलित मित्रांना व समाज भूषण पुरस्कार्थी यांना शिवशाही बस, हिरकणी, शिवनेरी,विठाई व वातानुकूलित इतरत्रही बस मध्ये प्रवासाची निःशुल्क लालपरी एस टी बस महाराष्ट्र बाहेर जिथपर्यंत जाते तिथपर्यंत प्रवास सवलत द्यावी, व इतरत्रही मागण्या संदर्भात गेल्या १० वर्षांपासून शासनाकडून वारंवार घोषणा केल्या परंतू दुर्दैवाने सांगावे लागते की जी आर काढला नाही ह्या बाबतीत सविस्तर चर्चा केली तेव्हा त्यांनी सकारात्मक विचार केला जाईल असे आश्वासन दिले ह्या प्रसंगी भूषण दडवे, योगेश वागदे,राम कावडकर,सौ मंदा वैरागडे, सौ माया घोरपडे उपस्थित होते

## माजी लोकसभा अध्यक्ष शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनाने स्वच्छ प्रतिमेचे शिस्तप्रिय नेतृत्व हरपले ~ केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले



**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी पनवेल :** मुंबई दिनांक 13 काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी लोकसभा अध्यक्ष; माजी केंद्रिय गृहमंत्री म्हणून देशासाठी योगदान देणारे ज्येष्ठ नेते शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनाने स्वच्छ प्रतिमेचे अभ्यासू शिस्तप्रिय नेतृत्व हरपले आहे अशा शब्दांत रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी दिवंगत शिवराज पाटील चाकूरकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली आहे. शिवराज पाटील चाकूरकर हे लोकसभेत 7 वेळा खासदार म्हणून निवडून आले.त्यांनी अनेक खात्यांचे केंद्र सरकार मध्ये राज्य मंत्री म्हणुन काम केले.त्यानंतर त्यांना 1991 ते 1996 पर्यंत लोकसभा अध्यक्ष म्हणून शिवराज पाटील चाकूरकर यांनी काम केले.सन 2004 मध्ये ते भारताचे गृहमंत्री म्हणून काम केले. अभ्यासू आणि स्वच्छ प्रतिमेचे शिस्तप्रिय नेतृत्व म्हणून शिवराज पाटील चाकूरकर हे देशाच्या स्मरणात कायम राहतील.त्यांना रिपब्लिकन पक्षाच्या वतीने आपण भावपूर्ण श्रद्धांजली वाहतो आहोत असे ना.रामदास आठवले यांनी पाठवलेल्या शोकसंदेशात म्हटले आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची स्मृती मंदिराला भेट



**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू नागपूर,प्रतिनिधी** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या रेशीमबाग येथील स्मृती मंदिर येथे आद्य सरसंघचालक प. पू. डॉ. केशव बळीराम हेडगेवार आणि द्वितीय सरसंघचालक प.पू. माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी यांच्या स्मृती स्थळाचे दर्शन घेऊन अभिवादन केले. यावेळी विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे, उपसभापती डॉ. नीलम गो-हे, मंत्री मंडळ व विधिमंडळातील सदस्य यांनीही स्मृती स्थळाचे दर्शन घेतले.

## कामोठे सेक्टर 6अ मधील सर्विस रोड सायन पनवेल महामार्गला जोडा ; शेकापची पालिकेकडे मागणी



**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर ) :** कामोठे परिसरातील वाढत्या वाहतूक कोंडीवर तोडगा काढण्यासाठी कामोठे बस स्टॉपजवळील सर्विस रस्ता सायन पनवेल महामार्गाला जोडावा तसेच सेक्टर ६अ वेंकट हॉटेलजवळ ते जवाहर इंडस्ट्री मार्गे कळंबोलीला जाणारा पूर्वीचा सेवा रस्ता तातडीने खुला करावा, अशी ठोस मागणी शेतकरी कामगार पक्षाचे कामोठे शहर अध्यक्ष अमोल शितोळे यांनी केले आहे.त्यांनी या संदर्भात मनपाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाला पत्र दिले आहे.

एकमेव प्रवेशमार्गामुळे दररोज त्रास कामोठेमध्ये प्रवेशासाठी सध्या फक्त एकच एन्ट्री पॉईंट उपलब्ध असल्याने शाळेच्या बस, रुग्णवाहिका आणि रोजच्या वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. वेळ आणि इंधन वाया जाणे, आपत्कालीन सेवांना उशीर होणे अशा अनेक समस्या वाढल्या असल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे.कामोठे विकसित करताना सिडकोने एकच प्रवेशमार्ग ठेवला. नंतर पाठपुराव्यानंतर सिडकोकडून सदर क्षेत्र पनवेल महापालिकेकडे हस्तांतरित झाल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे रस्त्यांच्या विस्तार व दुरुस्तीची जबाबदारी आता महापालिकेवर आहे. सुमारे ५–६ वर्षांपूर्वी हा सर्विस रस्ता वापरात होता. कोणतेही कारण न देता तो अचानक बंद करण्यात आला. यामुळे कळंबोलीहून येताना नागरिकांना महामार्गाचा धोकादायक पर्याय निवडावा लागत आहे. सायन–पनवेल महामार्गावर मागील काही वर्षांत ६२ अपघातांत २३ जणांचा मृत्यू आणि ५० जण जखमी झाल्याचा उल्लेख निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे पर्यायी आणि सुरक्षित मार्ग उपलब्ध होणे अत्यावश्यक आहे.

दोन्ही सर्विस रस्ते पनवेल महापालिकेच्या विकास आराखड्यात समाविष्ट असूनही त्यावर अंमलबजावणी झालेली नाही. महामार्गाला पर्यायी जोडणी मिळाल्यास सेक्टर ५, ६, ६अ, ७, ८ आणि ९ मधील नागरिकांचा प्रवास अधिक सुकर होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

यावेळी अमोल शितोळे यांची मागणी करताना सांगितले आहे की ,कामोठे बस स्टॉपजवळील सर्विस रस्ता महामार्गाला तातडीने जोडावा, सेक्टर ६अ–जवाहर इंडस्ट्री–कळंबोली सर्विस रस्ता पुनः सुरु करावा, वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी तातडीच्या उपाययोजना कराव्यात, नागरिकांचे जीवन आणि इंधन दोन्ही वाचवण्यासाठी प्रशासनाने त्वरीत कृती करावी.अशी मागणी त्यांनी केली आहे .

# डिजिटल ग्रंथालय आणि पर्यावरण संरक्षण' या विषयावर, जयभवानी महाविद्यालय येथे एक दिवसीय कार्यशाळा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)** - पाटोदा येथील जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या ग्रंथालय विभाग आणि वनस्पतीशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शनिवार,दिनांक १३ डिसेंबर २०२५ रोजी 'डिजिटल ग्रंथालय आणि पर्यावरण संरक्षण' या विषयावरती एक दिवसीय कार्यशाळा महाविद्यालयात संपन्न झाली. या प्रसंगी भारतीय ग्रंथपालनशास्त्राचे जनक पद्मश्री डॉ.एस.आर.रंगनाथन यांना अभिवादन करण्यात आले. 'डिजिटल ग्रंथालय आणि पर्यावरण संरक्षण' या एक दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य डॉ.विश्वास कदम, श्री.शिवाजीराव पंडित कला,विज्ञान व वाणिज् महाविद्यालय, शिवाजीनगर गढी यांनी केले. या कार्यशाळेच्या



अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा विभाग शिवाजी महाविद्यालय, परभणी येथील प्रा.डॉ.बापूसाहेब भोसले हे होते तर व्यासपिठावर अंतर्गत मुल्यमापन हमी कक्षाचे प्रमुख प्रा.विनोद किर्दक तसेच प्रा. डॉ.सुनील जाधव, कनिष्ट विभाग प्रमुख प्रा.सतीश जरांगे यांची उपस्थिती होती.

या वेळी उद्घाटनपर भाषणात बोलताना प्राचार्य डॉ.विश्वास कदम म्हणाले कि, डिजिटल युगात ग्रंथालयांची बदलती भूमिका अधोरेखित करत पर्यावरणपूरक विचारसरणीसाठी डिजिटल ग्रंथालये कशी उपयुक्त ठरतात या वर प्रकाश टाकला. कागद विरहित कार्यपद्धती, ऑनलाइन माहिती साठवण आणि ज्ञानप्रसार या मुळे पर्यावरण संवर्धनास चालना मिळते, असे त्यांनी नमूद केले. या कार्यशाळेचे प्रास्ताविक ग्रंथपाल प्रा.ज्योती रकटे यांनी केले. प्रास्ताविकात कार्यशाळेच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. संरक्षणाच्या दृष्टीने डिजिटल ग्रंथालयांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. पेपरलेस ग्रंथालयामुळे पर्यावरण संरक्षणाला मोठी मदत होते. कागदाचा वापर कमी झाल्याने वृक्षतोड थांबवण्यास हातभार लागतो. तसेच माहिती शोधणे, जतन करणे व शेअर करणे अधिक सोपे, वेगवान आणि अचूक होते. संगणक, टॅबलेट, मोबाईल किंवा इंटरनेटच्या साहाय्याने वाचकांना कुठून ही व कधी ही माहिती मिळू शकते असे सांगितले. या नंतर अंतर्गत मुल्यमापन हमी कक्षाचे प्रमुख प्रा.विनोद किर्दक यांनी कार्यशाळेत बोलत असताना पर्यावरण संरक्षणासाठी जनजागृती निर्माण करण्यात ग्रंथालये आणि शैक्षणिक संस्था यांची महत्त्वाची जबाबदारी असून, डिजिटल साधनांच्या माध्यमातून ही जबाबदारी अधिक प्रभावीपणे पार पाडता येते, असे त्यांनी सांगितले. प्रमुख पाहुणे म्हणून बोलत असताना प्रा.डॉ.बापूसाहेब जीवनराव भोसले म्हणाले कि आजच्या डिजिटल युगात पेपरलेस लायब्ररी ही शाश्वत विकासाची संकल्पना असून शिक्षण, संशोधन आणि ज्ञान प्रसारासाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहे. पर्यावरणीय समस्यांची सद्यस्थिती मांडत शाश्वत विकासासाठी माहिती तंत्रज्ञानाचे महत्त्व स्पष्ट केले. डिजिटल ग्रंथालयांमधील ई-पुस्तके, संशोधन लेख, डेटाबेस आणि ऑनलाइन शैक्षणिक साधने विद्यार्थ्यांना पर्यावरणविषयक अद्ययावत माहिती सहज उपलब्ध करून देतात, असे त्यांनी सांगितले. पर्यावरण संरक्षणासाठी संशोधन, शिक्षण आणि जनजागृती या मध्ये डिजिटल माध्यमांचा योग्य वापर काळाची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. अध्यक्षीय सामारोपात बोलत असताना प्रा. डॉ.सुनील जाधव म्हणाले कि, डिजिटल ग्रंथालये आणि पर्यावरण संरक्षण यांचा परस्पर संबंध स्पष्ट करत, प्रत्येक विद्यार्थ्याने आणि शिक्षकाने पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारावी, असे आवाहन केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती व सामाजिक बांधिलकी वाढते, असे त्यांनी नमूद करून आयोजकांचे अभिनंदन केले. या कार्यशाळेच्या प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा.डॉ.अशोक देवगुडे यांनी करून दिला. या कार्यशाळेचे सुत्रसंचलन प्रा. डॉ.बी.बी.लोखंडे यांनी केले. आभार प्रा.बाळासाहेब जोशी यांनी मानले. या कार्यशाळेला सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व बहुसंख्येने विद्यार्थीनी आपला सहभाग नोंदवला.

## के व्ही के दहीगाव ने मध्ये क्रॉपसॅप अंतर्गत जिल्हातील कृषि अधिकाऱ्यांसाठी शेतकरी शेतीशाळा प्रशिक्षकांचे प्रशिक्षण संपन्न

### नवनवीन तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी कृषि अधिकाऱ्यांसाठी शेतकरी शेतीशाळाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर** : श्री मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्था ,कृषि विज्ञान केंद्र, दहीगाव (ने.) येथे अहिल्यानगर जिल्ह्यातील शेती क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञाणाचा प्रसार करण्यासाठी क्रॉपसॅप अंतर्गत निवडलेले कृषि अधिकाऱ्यांसाठी शेतकरी शेतीशाळा प्रशिक्षकांचे प्रशिक्षण कार्यक्रम ८ ते १२ डिसेंबर २०२५ या कालावधीत आयोजन करण्यात आले.

या प्रशिक्षणा दरम्यान डॉ. श्यामसुंदर कौशिक, प्रमुख आणि वरिष्ठ शास्त्रज्ञ, कृषि विज्ञान केंद्र, दहीगाव ने, सुधाकर बोराळे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, अहिल्यानगर तसेच अमोल काळे, तंत्र अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालय श्रीरामपूर यांनी मार्गदर्शन केले.

कृषि क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञान व पद्धती, एकीकृत कीड-रोग व्यवस्थापन, हवामान आधारित सल्ला, पीक निरीक्षण तंत्र, तसेच शेतकरी शेती शाळा प्रभावीपणे कशी राबवावी याबाबत माणिक लाखे,



केव्हीके शास्त्रज्ञ-पिक संरक्षण, धनंजय हिरवे तालुका कृषि अधिकारी नेवासा, निलेश बिबवे, सुखदेव जमदाडे, केव्हीके शास्त्रज्ञ सचिन बडधे, प्रकाश बहिरट, व इतर तज्ञांनी सखोल मार्गदर्शन केले.

अहिल्यानगर जिल्ह्यातील ७ तालुक्यांमधून (नेवासा, शेवगाव, पाथर्डी, कर्जत, जामखेड, श्रीगोंदा व नगर) निवडलेले कृषि अधिकाऱ्यांनी या प्रशिक्षण कार्यक्रमा मध्ये सक्रिय सहभाग नोंदवला. प्रशिक्षण मध्ये विधी प्रात्यक्षिके, क्षेत्रभेटी, समूहचर्चा आणि आधुनिक कृषि तंत्रज्ञानावरील व्याख्यातांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. या दरम्यान प्रशिक्षणार्थ्याकडून विविध उपक्रम, लघु प्रयोग, प्रात्यक्षिके ,विविध प्रयोग करून घेण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान निवडलेले कृषि अधिकाऱ्यांनी मनोगत व्यक्त करतांना सांगितले की, क्रॉपसॅपच्या मदतीने पीक संरक्षण व उत्पादन व्यवस्थापन अधिक शास्त्रीय पद्धतीने करता येते. या प्रशिक्षणामुळे प्रशिक्षकांना त्यांच्या तालुक्यात शेतकरी शाळा प्रभावीपणे राबविण्यासाठी महत्त्वपूर्ण दिशा मिळणार आहे. या पाच दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाला सहभागी आणि आयोजकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून कृषि विज्ञान केंद्र, दहीगाव (ने.) द्वारे जिल्ह्यातील कृषि विकासाला एक महत्त्वपूर्ण चालना मिळणार आहे. या कार्यक्रमामध्ये केव्हीके चे शास्त्रज्ञ नारायण निबे, नंदकिशोर दहातोंडे, डॉ. चंद्रशेखर गवळी, प्रकाश हिंगे व कृषि विज्ञान केंद्राचे सर्व शास्त्रज्ञ व कर्मचारी अंकुश जोगदंड, तालुका कृषि अधिकारी शेवगाव, निलेश भागवत, सुर्यकांत काकडे, तसेच इतर मान्यवर हजर होते. आभार इंजी. राहुल पाटील यांनी केले.

## दिव्यांगांना स्वावलंबनाची संधी देणारा JNPA–चा स्तुत्य उपक्रम ; उरण तालुक्यातील दिव्यांगांना व्यवसायोपयोगी साहित्याचे मोफत वाटप

**दैनिक युवक आधार**

**रणिता ठाकूर/उरण रायगड** : दिव्यांग व्यक्तींना केवळ सहानुभूती न देता स्वावलंबनाची संधी देणे ही काळाची गरज आहे. स्वतःचा व्यवसाय उभारण्यासाठी आवश्यक साधने व सक्षम पाठबळ मिळाल्यास दिव्यांग व्यक्ती सन्मानाने उपजीविका करू शकतात आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात आत्मविश्वासाने सहभागी होऊ शकतात. अशा उद्योजकतेला चालना देणारे उपक्रम सामाजिक समतेचा पाया अधिक भक्कम करतात. दिव्यांग व्यक्तींना व्यवसायाची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल भारतातील सर्वोत्तम कामगिरी करणारे बंदर — जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण (JNPA) यांचे मनःपूर्वक आभार दिव्यांग बांधवांनी व्यक्त केले. भारतामधील सर्वोत्तम कामगिरी करणारे बंदर म्हणून ओळखले जाणारे जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण (JNPA) यांच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (CSR) उपक्रमांतर्गत दिव्यांग व्यक्तींसाठी उद्योजकता व उपजीविका विकास प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाअंतर्गत दिव्यांग व्यक्तींना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने



आवश्यक व्यवसायोपयोगी साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले.हा कार्यक्रम जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण व "लाहस प्रतिष्ठान – आणखी एक उज्ज्वल स्वातंत्र्य", ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १० डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजता, JNPA मल्टीपर्पज हॉल येथे संपन्न झाला.

सदर कार्यक्रमप्रसंगी मा. श्री. रविष कुमार सिंग( उपाध्यक्ष, JNPA – IRS), मा. सौ. मनिषा जाधव मॅडम (महाव्यवस्थापिका – प्रशासन व सचिव) यांची प्रमुख उपस्थिती होती. विनय मल्ल-व्यवस्थापक, रवींद्र पाटील JNPA विश्वस्थ, यांसह विजय ओझाला ( विश्वस्त- लहास प्रतिष्ठान ), ज्ञानेश्वर भोईर( प्रमुख-लहास प्रतिष्ठान), प्रतीक्षा फर्डे (समन्वयक), दिव्यांग सामाजिक संघटना उरणचे सर्व शिलेदार, संघटनेचे सल्लागार मा. श्री. मदन पाटील, तसेच उरण तालुक्यातील लाभार्थी दिव्यांग बांधव व त्यांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात एकूण ४४ व्यवसायोपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात आले. त्यामध्ये २ लॅपटॉप, ११ झेरॉक्स मशीन, २० शिलाई मशीन आणि ११ घरघंटी यांचा समावेश होता. या साहित्यामुळे दिव्यांग व्यक्तींना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची प्रेरणा मिळून आत्मनिर्भरतेकडे एक ठोस पाऊल टाकण्यास मदत होणार आहे.

## विद्याभूषित आंबेडकरी योद्धा: पँथर डॉ. प्रल्हाद रामभाऊ खंदारे यांचा संघर्षमय प्रेरणादायी प्रवास



दलित पँथर चळवळीपासून रिपब्लिकन चळवळीत स्वतःचा ठसा उमटविणारे, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सहकार क्षेत्रात कार्य करणारे, ॲडव्होकेट, डॉक्टरेट अशा अनेक पदव्या धारण करणारे विद्याभूषित प्रल्हाद रामभाऊ खंदारे हे समाजसेवक तर आहेतच. पण महाराष्ट्र शासनाने त्यांना डॉक्टरेट बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार देऊन गौरविले आहे.

आज त्यांचा ६२वा वाढदिवस आहे. त्या निमित्ताने त्यांच्या कार्याविषयी थोडेसे लिहीत आहे.

डॉ. प्रल्हाद रामभाऊ खंदारे यांचा जन्म १५ डिसेंबर १९६३ रोजी गिरगाव, औरंगाबाद, मराठवाड्यात सर्वसाधारण कुटुंबात झाला. घरची आर्थिक परिस्थिती चांगली होती. त्यामुळे बालपण सुखात गेले. त्यांचे वडील समाजसुधारक व दानशूर व्यक्तिमत्त्व होते. ते ठेकेदार होते. प्रल्हाद खंदारे यांचे शालेय शिक्षण नागपूर, औरंगाबादात, महाविद्यालयीन शिक्षण मुंबईत व उच्च शिक्षण मुंबई विद्यापीठात झाले. त्यांनी पी.एच.डी. (लॉ), एल.एल.एम., एल.एल.बी., एम.कॉम., डी.एल.एल., ॲड.एल.डब्ल्यू. अशा अनेक पदव्या संपादन केल्या आहेत. लहानपणापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याप्रमाणे विद्याभूषित व्हावे, हे त्यांचे स्वप्न होते. ही त्यांची कृती करून त्यांनी दाखविले.

१९८२ साली त्यांनी दलित पँथर चळवळीस झोकून दिले. कुणावर अन्याय झाला की त्यांचे मन पेटून उठत असे. मराठवाडा विद्यापीठ नामांतर लढ्यात त्यांना तुरुंगवास भोगावा लागला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातील रिपब्लिकन पक्ष त्यांना अभिप्रेत होता. १९८६ ते १९८८ ते भारतीय रिपब्लिकन पक्षात मुंबई प्रदेश संघटक होते.

ते तरुण असल्यामुळे अंगात रग होती. म्हणून ते युथ रिपब्लिकन महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष होते. १९८९ ते १९९२ त्यांनी चार वर्षे युवकांचे प्रश्न हिरिरीने सोडविले आहेत. १९९२ ते १९९५ ते भारिप बहुजन महासभा मुंबईचे प्रदेश कार्यालयीन सचिव होते.

१९९५ ते १९९७ त्यांनी रेल्वेतील फेरीवाल्यांचे प्रश्न जाणून घेतले व त्यांनी मुंबईतील रेल्वे फेरीवाला विक्रेता महासंघाला मार्गदर्शन केले आहे.

ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी त्यांचे काम जवळून पाहिल्यानंतर ते त्यांचे उजवे हात समर्थक झाले. त्यानंतर ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी त्यांच्या गळ्यात १९९८ साली मुंबई प्रदेश भारिप बहुजन महासंघाच्या अध्यक्षपदाची सूत्रे दिली. आणि ते लोकप्रिय अध्यक्ष आहेत. एक वर्ष त्यांनी पक्षसंघटना मजबूत केली.

त्यानंतर रिपब्लिकन पक्षाच्या ऐक्याचे वारे वाहू लागले.२००० ते २००२ साली एकीकृत रिपब्लिकन पक्षाच्या प्रदेश समन्वय समितीचे त्यांनी काम पाहिले. २००२ ते २००३ साली त्यांनी रामदास आठवले यांच्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या सरचिटणीस व केंद्रीय कार्यकारी सदस्य म्हणून संघटनेतून काम केले. २००४ ते २००५ साली महाराष्ट्र राज्य भारतीय रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष झाले. २००६ साली त्यांनी रिपब्लिकन क्रांती सेना स्थापना केली. २००५ ते २००६ साली त्यांनी निवडणूक सिनेट निवडणुकीत सहभाग घेतला. वकिलीची पदवी घेतल्यानंतर २००८ ते २००९ साली ॲडव्होकेट फोरमची स्थापना केली. आंबेडकरी एकता विचार मंचच्या माध्यमातून त्यांनी आंबेडकरी विचार समाजात रुजविले. त्यांनी २०१० साली श्रीलंका कोलंबो येथे भरलेल्या जागतिक बौद्ध धम्म परिषदेत उपस्थिती दर्शविली.२०११ साली रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले महाराष्ट्र प्रदेशाचे ते संघटक सचिव झाले. २०१२ साली त्यांनी स्वयंभू कोकण मागासवर्गीय गृहनिर्माण संस्थेची स्थापना केली.

पण ही संस्था शासकीय अधिकाऱ्यांच्या उडवाउडवीच्या उत्तरामुळे शासकीय लालफितीत अडकली आहे. राजकीय जीवनात ते रामदास आठवले व ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या पक्षात कधीच रमले नाहीत. मग त्यांनी २०१३ साली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत प्रवेश केला. २०१३ ते २०२३ सालापर्यंत ते सरचिटणीस व आजमितीपर्यंत प्रदेश उपाध्यक्ष पदावर कार्यरत आहेत. दरम्यान त्यांनी आपला वकिली व्यवसाय सोडला नाही.

भारत सरकारने त्यांची नोटरी म्हणून नियुक्ती केली. वकिली करीत असताना त्यांना अध्यापनाची आवड होती. म्हणून त्यांनी राजश्री शाहू कॉलेज ऑफ लॉ, सायन, मुंबई व संदेश कॉलेज ऑफ लॉ, विक्रोळी, मुंबई येथे प्रभारी प्राचार्य म्हणून काम पाहिले आहे.

सिद्धार्थ कॉलेज ऑफ लॉ येथे प्राध्यापक म्हणून विद्यार्थ्यांना शिकविले आहे. पण त्यांच्यातला पँथर शेवटपर्यंत जागा आहे. मग त्यांनी चित्रपट क्षेत्रात निर्माता म्हणून पदार्पण केले. पँथर जिंदा है (हिंदी डॉक्युमेंट्री), आय एम नॉट दलित (हिंदी डॉक्युमेंट्री), पँथर राजा ढाले (हिंदी डॉक्युमेंट्री बायोपिक) आदींची निर्मिती केली आहे.

त्यांचा जजमेंट मराठी चित्रपटात प्रदर्शित झाला आहे. ते अनेक पुरस्कारांनी सन्मानित आहेत. वेळोवेळी रस्त्यावर उतरून विविध प्रश्नांवर धरणे आंदोलन केली आहेत. अशा या चौफेर व्यक्तिमत्त्वाच्या डॉ. प्रल्हाद खंदारे यांना भावी वाटचालीस शुभेच्छा.

**- नासिकेत पानसरे**

## जन्म मृत्यू नोंदणीच्या गुंतागुंतीत सर्वसामान्यांची कोंडी : ॲड.महेश बेदरे

### विलंब नोंदणीच्या अन्यायकारक प्रक्रियेची व्यथा आमदार सुरेश धस यांच्या कडे मांडणार

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** जन्म व मृत्यू विलंब नोंदणीचे अधिकार न्यायालयाकडून महसूल विभागाकडे गेल्यापासून ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांचे हाल मोठ्या प्रमाणात वाढले असल्याचे मत पाटोदा तालुका पत्रकार संघाचे सचिव तथा वकील संघाचे प्रसिद्धीप्रमुख ॲड. महेश बेदरे यांनी व्यक्त केले आहे. मृत्यू झाल्यानंतर ही प्रमाणपत्र मिळवण्यासाठी कुटुंबियांना महिने-महिने कार्यालयांच्या फेऱ्या माराव्या लागत असून ही प्रक्रिया सर्वसामान्यांसाठी अत्यंत त्रासदायक ठरत आहे, असे त्यांनी सांगितले असून आता ही व्यथा लवकरच आमदार सुरेश धस यांच्या समोर मांडणार असून आमदार सुरेश धस यांच्या कडे या संदर्भात मार्ग काढण्यासाठी विनंती करण्यात येणार असल्याचे देखील अँड.बेदरे यांनी प्रसिद्ध पत्रकात म्हटले आहे. पूर्वी ही प्रक्रिया न्यायालयाकडे असताना या बाबत कोणताही अन्यायकारक गोष्टी घडत नव्हत्या परंतु महसूल विभागाकडे गेल्यापासून अशा प्रकारच्या घटना समोर येत



आहेत पाटोदा तालुक्यातील परिस्थिती विशेषतः गंभीर असून गेल्या एका वर्षात मृत्यू विलंब नोंदणीसाठी आलेल्या अर्जांपैकी तब्बल १७ अर्ज प्रशासनाकडून नाकारण्यात आले आहेत, तर केवळ ५ प्रकरणांना मंजुरी मिळाली आहे. मंजूर प्रकरणांपैकी काही प्रकरणे आत्महत्येसारख्या गंभीर कारणांमुळे आवश्यक कागदपत्रे उपलब्ध असल्यानेच मार्गी लागली आहेत. उर्वरित सर्वसामान्य नागरिकांचे अर्ज मात्र पुरावे अपुरे असल्याने किंवा प्रक्रियेची माहिती नसल्यामुळे फेटाळले जात आहेत. ग्रामीण व गरीब कुटुंबांमध्ये घरात मृत्यू झाल्यास पोस्टमार्टम अहवाल कुठून आणायचा, कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत, अर्ज कुणाकडे व कसा करायचा, या बाबत स्पष्ट मार्गदर्शन मिळत नाही. तहसील कार्यालयात या प्रक्रियेसाठी स्वतंत्र मदत व्यवस्था नसल्याने नागरिकांना वारंवार फेऱ्या, अपूर्ण माहिती आणि मानसिक तणाव सहन करावा लागत आहे. महसूल विभागावर आधीच अतिवृष्टी नुकसान भरपाई, पिक विमा तक्रारी, पुरवठा विभाग, भूमापन, मालमत्ता वाद आणि विविध शासकीय योजनांचा मोठा ताण आहे. त्यातच विलंब नोंदणीसारखी संवेदनशील व कायदेशीर बाब जोडल्याने प्रशासनिक भार वाढला असून त्याचा थेट फटका ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांना बसत असल्याचे ॲड.महेश बेदरे यांनी नमूद केले.

जन्म व मृत्यू विलंब नोंदणीच्या प्रक्रियेतून निर्माण झालेल्या या सर्व अडचणी, अन्याय आणि नागरिकांची व्यथा लवकरच आमदार सुरेश धस यांच्या समोर सविस्तरपणे मांडण्यात येणार असून, सर्वसामान्यांना दिलासा मिळेल असा ठोस आणि व्यवहार्य मार्ग काढावा, अशी मागणी पाटोदा तालुका पत्रकार संघ व पाटोदा वकील संघाच्या वतीने करण्यात येणार आहे असे अँड.महेश बेदरे यांनी सांगितले आहे.

# कोकणचे सुपुत्र मोहन कदम,श्रीराम वैद्य,दीपक फणसळकर,शांताराम गुडेकर, केतन भोज "कोकण रत्न- २०२५ मानद पदवी पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**मुंबई वार्ताहर :** सामाजिक कार्यकर्ते जेष्ठ नागरिक पत्रकार, गुणवंत कामगार पुरस्कार विजेते श्री. श्रीराम विष्णू वैद्य यांना स्वतंत्र कोकण राज्य अभियानातर्फे पत्रकारिता /सामाजिक कार्य क्षेत्रात उत्कृष्ट योगदानाबद्दल "कोकणरत्न पदवी-२०२५ पुरस्काराने गौरविण्यात आले.हा पुरस्कार प्रदान सोहळा १३ डिसेंबर २०२५ रोजी संध्याकाळी ४ वाजता मुंबई मराठी पत्रकार भवन, आझाद मैदान शेजारी, मुंबई येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.स्वतंत्र कोकण राज्य अभियानातर्फे मुंबईपासून सिंधुदुर्गपर्यंत कोकणातील निवडक व्यक्तींना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. स्वतंत्र कोकणराज्य अभियान तर्फे प्रदान करण्यात येणाऱ्या "कोकणरत्न" या मानाच्या पदवीसाठी यंदा उल्लेखनीय सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्तींची निवड करण्यात आली आहे. कोकणच्या सर्वांगीण विकासासाठी आणि सामाजिक प्रबोधनासाठी कार्यरत असलेल्या विविध मान्यवरांचा गौरव करणारा हा अतिशय स्तुत्य

उपक्रम असून यंदाच्या सोहळ्याला विशेष उत्साहाचे वातावरण लाभले आहे. स्वतंत्र कोकणराज्य अभियानाचा हा उपक्रम कोकणातील सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि जनकल्याणाच्या कार्यात योगदान देणाऱ्या कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देणारा ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. श्री संजय कोकरे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा दिमाखात संपन्न झाला. या पुरस्कार सोहळ्यास प्रमुख पाहुणे ज्येष्ठ पत्रकार सचिन कळझुनकर व्यासपीठावर उपस्थित होते. मुंबई अध्यक्ष श्री धनंजय कुवेसकर, खजिनदार श्री राजेंद्र सुर्वे, नेते श्री सुभाष राणे आणि सल्लागार श्री दिलीप लाड या मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.



गेली अनेक वर्षे पत्रकारितेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील प्रश्न धडाडीने मांडणारे रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यामधील देवरुख शहर पासून जवळच असलेल्या श्री क्षेत्र मार्लेश्वर परिसर मधील आंगवली (रेवाळे वाडी) चे सुपुत्र श्री. शांताराम ल. गुडेकर तसेच मु. पो. कासार कोळवण गावातील समाज सेवक, पत्रकार, अष्टपैलू व्यक्तीमत्व श्री. मोहन जयराम कदम, लांजा तालुका सुपुत्र केतन भोज,दीपक फणसळकर आणि रायगड चे सुपुत्र श्रीराम वैद्य यांना प्रतिष्ठेच्या 'कोंकणरत्न पदवी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पत्रकार श्रीराम वैद्य, मोहन कदम, शांताराम गुडेकर, केतन भोज, दीपक फणसळकर यांना अनेक राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले असून त्यांची पुरस्कारांची मालिका अखंडपणे सुरूच आहे.त्यांच्या या चतुरस्र कामगिरीबद्दल स्वतंत्र कोकण राज्य अभियानातर्फे "कोंकणरत्न पदवी" पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यांनी ग्रामीण भागातील अनेक मूलभूत प्रश्न, स्थानिक स्तरावरील प्रशासकीय कामकाजातील त्रुटी अत्यंत परखडपणे आणि नि:पक्षपातीपणे समाजासमोर आणल्या. त्यांचे तळागाळातील सामान्य नागरिकांच्या समस्यांना प्रभावीपणे वाचा फोडल्याने प्रशासनाला अनेक वेळा या प्रश्नांची गंभीर दखल घेण्यास भाग पाडले आहे. सामाजिक संघटनांच्या माध्यमातून ते अनेक सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य विषयी उपक्रम राबवित असतात.रत्नागिरी, रायगड जिल्ह्यासह त्यांचे कार्य हीच त्यांची एक ओळख निर्माण झाली.कोणतीही अपेक्षा न करता निस्वार्थी वृत्तीने समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी ते सतत झटत असतात.

श्रीराम वैद्य हे गेली ४५ वर्ष सामाजिक कार्यात कार्यरत आहेत. अनेक संघटनांवर पदाधिकारी,सदस्य म्हणून काम पाहत आहेत.त्यांना आजवर विशेष कार्यकारी अधिकारी,गणुवंत कामगार पुरस्कार, आदर्श मित्र पुरस्कार, राष्ट्रीय सामाजिक एकता गौरव पुरस्कार, मुंबई रत्न पुरस्कार, समाज गौरव पुरस्कार, कोकण दिप सामाजिक सेवा पुरस्कार, कामगार भूषण पुरस्कार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर रयत सेवक पुरस्कार, आदर्श मुंबईकर महापौर सन्मान पत्र, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्याचे गौरव पत्र, नशाबंदी मंडळ नागरिक समिती गौरवपत्र, रक्तदान शिबिर प्रशस्तीपत्र, कामगार सभा आकाशवाणी मुलाखत, नागरी संरक्षण दल, बृहनमुंबई, डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय फेलोशिप, स्वकुळ वैभव पुरस्कार व संकल्प कृतार्थ जीवन गौरव पुरस्कार आदी पुरस्कार मिळालेले आहेत.

श्री. मोहन जयराम कदम हे एक अष्टपैलू-व्यासंगी सामाजिक कार्यकर्ता आणि निस्पृह- सजग पत्रकार असे व्यक्तिमत्व आहे. त्यांना आजवर राष्ट्रीय एकता सन्मान महासोहळा,राष्ट्रीय ग्राउंड लीडरशीप आयकॉन पुरस्कार,कोकणदीप समाजरत्न पुरस्कार २०२५, एशियन टॅलेन्ट गोल्डन अवॉर्ड सोहळा. भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाज गौरव पुरस्कार,प्रेरणा फाउन्डेशन तर्फे महाराष्ट्र उत्कृष्ट समाजसेवक राज्यस्तरीय पुरस्कार २०२५, प्रेरणा फाउन्डेशन तर्फे राज्यस्तरीय माणुसकी रत्न पुरस्कार २०२५, इनोव्हेटिव्ह मानबिंदू प्रकाशन व अमरदीप फाउंडेशन तर्फे राज्यस्तरीय जनरत्न प्रतिक्षा भूषण पुरस्कार २०२४, धगधगती मुंबई पुरस्कार २०२३,कला साधना सोशल संस्था पुरुष उत्कृष्टता पुरस्कार २०२३,लोकगौरव राष्ट्रीय एकात्मता परिषद राष्ट्रीय लोक कल्याणकारी सेवा रत्न पुरस्कार २०२३,कार्यदर्पण आणि इव्हेंट टी एम जी सहयोगी संस्थेतर्फे जनगौरव कार्य दर्पण आयकॉन पुरस्कार २०२२,आंतरराष्ट्रीय मानव हक्क सेवा परिषद व महाराष्ट्र न्यूज १८ 'भारत श्री' नॅशनल पुरस्कार २०२२ आदी पुरस्कार त्यांना प्राप्त झालेले आहेत.

सामाजिक कार्यातील सर्वोच्च पुरस्कार कोकणरत्न म्हणून दीपक फणसळकर यांचा गौरव करण्यात आला. समाज तुमच्या कार्याची दखल तेव्हाच घेते जेव्हा तुमच्या सामाजिक कार्याचे दाखले नव्या तरुण पिढीसाठी दिले जातात.दीपक फणसळकर या कामासाठी अग्रेसर आहेतसामाजिक कार्यात कायम आपले योगदान देऊन समाजाला नव्या दिशेने घेऊन जाणारे ,छोट्या छोट्या कार्यांनी मोठे बदल घडून येतात तुमचं या कार्यात सातात्यते टिकणे फार महत्वाचे असते .श्री फणसळकर यांची समाजाप्रती असलेली कार्यतत्पर सेवा आणि सातत्य आणि म्हणूनच स्वतंत्र कोकणराज्य अभियाना तर्फे त्यांची "कोकणरत्न"या सर्वोच्च पदवीसाठी निवड करण्यात आली .हा पुरस्कार त्यांना मुंबई मराठी पत्रकार भवन, आझाद मैदाना जवळ, मुंबई येथे स्वतंत्र कोकणराज्य अभियानाचे संस्थापक अध्यक्ष श्री संजय कोकरे आणि वरिष्ठ पत्रकार आणि संपादक श्री सचिन कळझुनकर सर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. फणसळकर यांना आजवर अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत.पुढील सामाजिक कार्यासाठी त्यांना अनेकांनी शुभेछया दिल्या आहेत.

समाजात बरेच लोक सामाजिक कार्यात योगदान देत असतात हा पुरस्कार त्या सर्व समाज बांधवांचा आहे जे आपले घर संसार सांभाळून समाज कार्य करतात असा मोलाचा संदेश कार्यक्रम दरम्यान श्री दीपक फणसळकर यांनी दिला.शांत्ताराम गुडेकर यांना महाराष्ट्र शासनाने "विशेष कार्यकारी अधिकारी" म्हणून २०१२ ते २०१७ या काळावधीसाठी नियुक्त केले होते.त्यांना डॉं. बाबासाहेब आंबेडकर फॅंलोशिप पुरस्कार -दिल्ली प्राप्त झालेला आहे.ते महाराष्ट्र शासनाच्या नागरी संरक्षण दल-एन विभाग-क्षेत्र-३ मध्ये स्वयंसेवक म्हणून कार्यरत होते. शिवाय महाराष्ट्र शासन अनुदानित नशाबंदी मंडळ- महाराष्ट्र राज्य या मंडळतर्फे नशाबंदी चे काम करतात.कोकण विभाग पत्रकार संघ मुंबई जिल्हा सचिव म्हणून ते काम पाहिले असून त्यांना नगर मित्र,आदर्श समाजसेवक ,समाजरत्न , दक्ष नागरिक ,कोकण भूषण ,वृत्तदिप पुरस्कार ,महापौर गौरवपत्र तसेच सोनी टि.व्ही वरील सी.आय.डी मालीकेला वर्धापनदिनानिमि आयोजित कार्यक्रमात शांत्ताराम गुडेकर यांना "स्थानिक हिरो" सी.आय.डी मेडल व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आलेले आहे.

शांताराम गुडेकर महाराष्ट्र हरित सेना, वन विभाग, महाराष्ट्र शासन चे सदस्य, माझी वसुंधरा, महाराष्ट्र शासन चे सदस्य आहेत. शिवाय माहिती अधिकार, पोलीस मित्र, पत्रकार संरक्षण सेना चे मुंबई जिल्हा प्रसिद्धी प्रमुख आहेत.अखिल भारतीय पत्रकार हक्क संसद समिती चे मुंबई उपनगर सचिव आहेत.रत्नागिरी जिल्ह्यातील लांजा तालुक्यामधील कोचरी गावातील सुपुत्र कु. केतन भोज यांचा हा सातवा पुरस्कार असून ते आरटीआय कार्यकर्ता आहेत. शिवाय कोकणच्या समस्यांवर लेखन करून त्यांचा पाठपुरावा सातत्याने ते करत आहेत. महाराष्ट्र हरित सेना,वन विभाग महाराष्ट्र शासनचे ते सदस्य आहेत.कोकणातील अनेक समस्या वर्तमान पत्रात मांडून त्यांना मार्गी लावण्यात केतन भोज अग्रेसर आहेत. त्यांना मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य यांच्या सहीचे सोशल मिडिया महामित्र हे सन्मानपत्रही प्राप्त झालेले आहे. शिवाय ते विविध संस्था,पत्रकार संघटना, वृत्तपत्र लेखक संघ,मंडळ यांचे पदाधिकारी असून हातात घेतलेलं प्रत्येक काम पूर्ण करण्यात ते यशस्वी झालेले आहेत.आजवर त्यांना २७ विविध पुरस्कार त्यांना प्राप्त झालेले आहेत. कोकणचे सुपुत्र श्रीराम वैद्य, मोहन कदम, दीपक फणसळकर, केतन भोज, शांताराम गुडेकर "कोकण रत्न- २०२५ मानद पदवी पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्यामुळे त्यांचे पत्रकार मित्र, विविध पत्रकार संघ, सामाजिक संघटना, शेतकरी संघटना, राजकीय पक्ष नेते, असंख्य वाचक, चाहते, हितचिंतक यांनी त्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

# ध्येय ठेवा,जीवन सुखी होईल मा.प्राचार्य आर.के.म्हात्रे नेरे

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/ एम.डी.भोईर :** जीवन सुखी व्हायचे असेल तर विद्यार्थ्यांनी आपल्या समोर ध्येय ठेवायला हवीत,असे विचार नेरे महा विद्यालयाचे सुप्रसिद्ध माजी प्राचार्य आर.के.म्हात्रेसर

यांनी मांडले.कार्यक्रमाघे अध्यक्षस्थानी साहित्यरत्न रायगडभूषण प्राएल.बी.पाटील होते.सूत्रसंचालन रंजना जोशी केणी आणि प्रा.प्रवीण मिर्लेकर यांनी रंगतदार केले. प्रास्ताविक या बाळासाहेब म्हात्रे महाविद्यालय आवरेचे प्राचार्य गावंड सर यांनी केले. येथे झालेल्या कोमसापच्या कविसंमेलनात लवेंद्र मोकल , रामचन्द्र म्हात्रे,अक्षता गोसावी,




केशव म्हात्रे,संजय केणी, प्रा. चिर्लेकर, शिवप्रताप पंडित, नरेश पाटील,संजीव पाटील, रंजना केणी आणि साहित्यरत्न प्रा.एल.बी.पाटील यांनी दर्जेदार कविता सादर करून मनसोक्त आनंद दिला.

प्राचार्य सुभाष ठाकूर यांनी कार्यक्रमाचे आयोजन अतिशय सुरेख केले.

# नागोठणे येथील रयान पॅलेस जमिनीची मालकी रयान पॅलेस सोसायटीच्या नावावर हस्तांतरित ; रयान पॅलेस फ्लॅट मालकांमध्ये आनंदाचे वातावरण

**दैनिक युवक आधार**

**नागोठणे वार्ताहर :** हॉटेल लेक व्ह्यूजवळील सिटी सर्वे क्रमांक 463 मध्ये बांधलेल्या इमारतीच्या संकुलाची मालकी डीम्ड कन्व्हिनियन्सद्वारे फ्लॅट खरेदी करणाऱ्यांची रयान पॅलेस सोसायटी (सहकारी गृहनिर्माण संस्था) च्या नावावर आहे, संस्थेने गेल्या चार वर्षांपासून जिल्हा उपनिबंधक-अलिबाग आणि दिवाणी न्यायालय (वरिष्ठ विभाग) यांसारख्या संस्थांमध्ये डीम्ड कन्व्हिनियन्सद्वारे सोसायटीच्या नावावर मालकी मिळविण्यासाठी एनआर बिल्डर्स अँड डेव्हलपर्स विरुद्ध रयान पॅलेस सोसायटी यांनी चालवलेली कायदेशीर लढाई



जिंकली असून रयान पॅलेस फ्लॅट मालकांमध्ये आनंदाचे वातावरण असल्याची माहीती सोसायटी अध्यक्ष सुधीर (आण्णा) येसोधरन कुन्नुथरा यांनी दिली.

अधिक माहिती देताना सुधीर आण्णा यांनी सांगितले की, नागोठणे येथील हॉटेल लेक व्ह्यूजवळील सिटी सर्वे क्रमांक 463 मध्ये एनआर बिल्डर्स अँड डेव्हलपर्सने बांधलेल्या आणि 2017 – 2018 मध्ये विकल्या गेलेल्या इमारतीच्या संकुलातील फ्लॅट खरेदी करणाऱ्या 18 जणांची संस्था रयान पॅलेस सीएचएस लिमिटेडने कायद्यानुसार इमारत असलेल्या जमिनीची मालकी हस्तांतरित केलेली नव्हती. याबाबत रयान पॅलेस सोसायटीने गेल्या 04 वर्षांपासून जिल्हा उपनिबंधक-अलिबाग आणि दिवाणी न्यायालय (वरिष्ठ विभाग) यांसारख्या संस्थांमध्ये डीम्ड कन्व्हिनियन्सद्वारे सोसायटीच्या नावावर मालकी मिळविण्यासाठी एनआर बिल्डर्स अँड डेव्हलपर्स विरुद्ध रयान पॅलेस सोसायटी यांनी चालवलेली कायदेशीर लढाई जिंकली आहे. सदरील इमारत असलेली सिटी सर्व्हे क्रमांक 463 मधील संपूर्ण जमिनीची मालकी रयान पॅलेस सीएचएस लिमिटेडच्या नावावर हस्तांतरित करण्यात आली आहे आणि सोसायटीचे नाव रोहा तालुका भूमी अभिलेख कार्यालयाच्या प्रॉपर्टी कार्डमध्ये नोंदविण्यात आले आहे. या विजयाने रयान पॅलेस फ्लॅट मालकांमध्ये आनंदाचे वातावरण असल्याचे सांगून इतर सर्व फ्लॅट मालकांना व रहिवाशी यांनी फ्लॅट खरेदी करणाऱ्या ग्राहकांचे शोषण करणाऱ्या काही बांधकाम व्यावसायिकांवर कायदेशीर कारवाई करावी आणि संबंधित इमारत ज्या जमिनीवर आहे त्या जमिनीची मालकी फ्लॅट खरेदीदारांनी स्थापन केलेल्या सोसायटीच्या नावावर हस्तांतरित करावी अशी विनंती शेवटी सुधीर आण्णा यांनी केली.

# दादासाहेब फाळके चित्रपट युनियनतर्फे ‘दादासाहेब फाळके अवॉर्ड-२०२५’ जाहीर

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, (प्रतिनिधी):** भारतीय चित्रपटसृष्टीचे दिग्गज आणि ‘भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक’ म्हणून ओळखले जाणारे दादासाहेब फाळके यांच्या नावाने दरवर्षी देण्यात येणारा प्रतिष्ठेचा ‘दादासाहेब फाळके अवॉर्ड-२०२५’ यावर्षीही भव्यदिव्य पद्धतीने आयोजित करण्यात आला आहे. दादासाहेब फाळके चित्रपट युनियनतर्फे जाहीर झालेल्या या पुरस्कारासाठी विविध क्षेत्रातील अनेक दिग्गज कलावंतांची निवड करण्यात आली आहे.

या पुरस्कार सोहळ्यात रोहिणी हट्टंगडी, विजय पाटकर, अरुण नलावडे, वर्षा दांदळे, गिरीश ठापर, विलास बडे, उस्ताद मकबूल हुसेन खान, सुनील गोडबोले आणि दिलीप सेन, जावेद हैदर, यांच्यासह अनेक मान्यवर कलाकारांचा गौरव करण्यात येणार आहे. अभिनय, दिग्दर्शन, संगीत, कला आणि सांस्कृतिक योगदानाच्या आधारे या कलावंतांनी दिलेल्या अनमोल कार्याची दखल घेत यंदाचे अवॉर्ड ठरविण्यात आले आहेत.

दादासाहेब फाळके चित्रपट युनियन ही भारत सरकारकडून नोंदणीकृत संस्था (अजित म्हामुणकर - राष्ट्रीय अध्यक्ष) असून ,अध्यक्षांच्या मार्गदर्शनाखाली ‘Appreciation to the Creation’ या उद्दिष्टाने गेल्या अनेक वर्षांपासून चित्रपटसृष्टीत कार्यरत व्यक्तींना प्रोत्साहन देत आहे. २०२५ चा अवॉर्ड सोहळा अधिक भव्य, अधिक समृद्ध आणि कलावंत-केंद्रित करण्याचा युनियनचा प्रयत्न असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या वर्षीचा कार्यक्रम रविंद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी, सिद्धिविनायक मंदिराजवळ, मुंबई येथे उत्साहात पार पडणार आहे. रसिक, कलावंत आणि नागरिकांसाठी नोंदणी प्रक्रिया सुरू असून ‘Register Now – 81081 48889’ या क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे.

चित्रपटसृष्टीतील अनुभवी तसेच नवोदित कलाकारांसाठी हा पुरस्कार एक मोठा सन्मान मानला जातो. दादासाहेब फाळके यांच्या स्मृती कायम




ठेवत भारतीय चित्रपटजगताचा जागतिक स्तरावरचा लौकिक वाढविण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

युनियनतर्फे पुढील काही दिवसांत आणखी काही नामांकित कलाकारांची नावे जाहीर होण्याची शक्यता आहे.

# परिणीता सोशल फाऊंडेशनचा पाचवा वर्धापनदिन ; चंदुकाका सराफ ज्वेलर्सच्या पनवेल येथील शो रुममध्ये होणार

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई (प्रतिनिधी) :** परिणीता सोशल फाऊंडेशनचा पाचवा वर्धापनदिन सोमवार दि. 15 डिसेंबर 2025ला साजरा होतोय. महिलांनी, महिलांसाठी तयार केलेलं व्यावसायिक व्यासपीठ अशी सरळ व्याख्या परिणीता सोशल फाऊंडेशनची करता येते. परिणीताच्या संस्थापिका सौ. साक्षी प्रशांत सागवेकर यांच्या वाढदिवसालाच परिणीता संस्थेची निर्मिती झाली होती. त्यामुळे संस्थेचा आणि संस्थापिकेचा वाढदिवस एकाचदिवशी असा ही योग असतो. यावर्षीची अत्यंत खास आणि उल्लेखनीय बाब म्हणजे परिणीता सोशल फाऊंडेशन आणि सौ. साक्षी सागवेकर यांचा वाढदिवस ज्वेलरी क्षेत्रातली एक अग्रगण्य संस्था मे. चंदुकाका सराफ ज्वेलर्स हे साजरा करणार आहेत. चंदुकाका सराफ ज्वेलर्सच्या पनवेल येथील शो रुममध्ये एका खास कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं असून, पनवेल, कामोठे, खारघर, ठाणे अशा परिसरातील परिणीता सोशल फाऊंडेशनचे पदाधिकारी, वेळोवेळी संस्थेला सहकार्य करणाऱ्या प्रतिष्ठित व्यक्ती, परिणीताच्या सर्व व्यावसायिक महिला यांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न होणार आहे. गेल्या पाच वर्षात




परिणीता सोशल फाऊंडेशनने नवी मुंबई आणि ठाणे भागात स्वत:ची अशी एक वेगळी ओळख निर्माण केली. सुमारे 55हून अधिक व्यावसायिक प्रदर्शनं, महिलांसाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम, दरवर्षी होणारा वृक्षारोपण कार्यक्रम आणि सगळ्यात महत्त्वाचा आणि आता अत्यंत प्रतिष्ठेचा झालेला 'परिणीता सन्मान' हा पुरस्कार ही गेल्या 5 वर्षात परिणीतानं कमावलेली संपत्ती आहे. यावर्षी परिणीता सन्मान सोहळा राज्याचे उद्योग मंत्री मा. उदय सामंत यांच्या पालकत्वात संपन्न होणार आहे. त्यामुळे यावर्षीचा सोहळा खास असणार आहे. 2021 मध्ये परिणीता सोशल फाऊंडेशन अस्तित्वात आली. छोटे छोटे घरगुती व्यवसाय करून आपले आणि आपल्या कुटुबाचे पोट भरणाऱ्या असंख्य उद्योजिका या व्यासपीठावर एकत्र आल्या. सामाजिक कार्याची आवड म्हणून साक्षी सागवेकर यांनी या व्यासपीठाची सुरुवात केली. महिला उद्योजिकांना एकत्र आणत त्यांनी आजपर्यंत मुंबई आणि नवी मुंबई मध्ये पाच वर्षात 55 हून अधिक महिला उद्योजिकांची व्यवसाय प्रदर्शनं आयोजित केली ज्याचा फायदा असंख्य ग्राहकांना झाला. आज राज्यातील सुमारे 25 पेक्षा अधिक ठिकाणी परिणीता सोशल फाऊंडेशनच्या महिला उद्योजिकांचे ग्रुप तयार झाले आहेत. देशपातळीवर कार्य करण्यासाठी आता परिणीता तयार आहेत. हे कार्य फक्त व्यवसायापुरतं मर्यादित न ठेवता महिलांचा सर्वांगिण विकास व्हावा म्हणून अनेक सामाजिक उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम देखील परिणीता सोशल फाऊंडेशनच्या माध्यमातून राबवले जातात. अशा पद्धतीनं महिलेनं महिलांसाठी, महिलांच्या सक्षमतेसाठी तयार केलेलं हे व्यासपीठ आज पाचव्या वर्षात पदार्पण करीत आहे. त्यानिमित्तानं परिणीता सोशल फाऊंडेशन सोबत जोडल्या गेलेल्या सर्व महिला उद्योजिका, नोकरदार महिला आणि गृहिणींना लाख लाख शुभेच्छा तसेच परिणीता सोशल फाऊंडेशनच्या 5व्या वर्धापन दिनानिमित्त संस्थेला संस्थेच्या संस्थापिका साक्षी सागवेकर यांना वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा

मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

। उपसंपादक - श्री विलास गायकवाड । कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे । निवासी संपादक - श्री राकेश पाटील । सह संपादक - श्री मुकुंद कांबळे । महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

■ वर्ष : ३ ■ अंक : ९७ ■ सोमवार, १५ डिसेंबर २०२५ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514


































